







# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा








रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २९.०५.२०२६ | अंक नं. ०५० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020










# माजीमंत्री प्राजक्त तनपुरेंचा अखेर ३० मे रोजी मुंबईत भाजप प्रवेश; उमेदवारीही होणार जाहीर

### कॉंग्रेसकडून करण ससाणे यांना एबी फॉर्म

नगर - विधानपरिषदेची अहिल्यानगरची जागा अखेर भाजपसाठी सोडण्यात आली असून, या जागेवरुन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे हे उमेदवार असतील. तनपुरे यांचा ३० मे रोजी मुंबई येथे भाजपमध्ये प्रवेश होणार आहे. यावेळी त्यांची उमेदवारीही जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती तनपुरे यांच्या निकटवर्तीयांनी दिली.

विधानपरिषदेच्या अहिल्यानगरच्या जागेवरुन गेल्या काही दिवसांपासून जोरदार रस्सीखेच सुरु होती. जिल्ह्यात भाजपचे सर्वाधिक २०७ नगरसेवक असल्यामुळे भाजपाने या जागेवर हक्क सांगितला होता. तर दुसरीकडे मागील विधानपरिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे ही जागा होती. या जागेवर स्व. अरुणकाका जगताप हे निवडून आले होते. त्यामुळे ही जागा राष्ट्रवादीकडेच ठेवून या जागेवर स्व. अरुणकाका यांचे सुपूत्र सचिन जगताप यांना उमेदवारी द्यावी, अशी राष्ट्रवादीची मागणी होती. त्यासाठी आ. संग्राम जगताप हे देखील आग्रही होते. राष्ट्रवादी ही जागा सोडायला तयार नव्हते तर भाजप ही जागा स्वतःकडे घेण्यासाठी प्रयत्नशील होते. त्यामुळे महायुतीतील इतर सर्व जागांचे वाटप होऊनही अहिल्यानगरच्या जागेचा तिढा सुटला नव्हता. पक्षश्रेष्ठींच्या वारंवार बैठका झाल्यानंतर अखेर २९ मे रोजी अहिल्यानगरच्या जागेचा तिढा सुटला. यात भाजपने ही जागा आपल्याकडे घेवून माजी मंत्री तनपुरे यांच्या आमदारकीचा मार्ग मोकळा केला आहे. विधानसभेच्या पोटनिवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, प्रदेशाध्यक्ष आ. रवींद्र चव्हाण यांच्या विनंतीला मान देवून तनपुरे यांनी उमेदवारी केली नव्हती. त्यामुळे भाजपाचे आ. अक्षय कर्डिले यांच्या विजयाचा मार्ग सुकर झाला होता. विधानसभेची परतफेड विधानपरिषदेला करु, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले होते. त्यानुसार आता तनपुरे यांच्या उमेदवारीचा मार्ग मोकळा झाला आहे. तनपुरे हे ३० मे रोजी भाजपमध्ये प्रवेश करतील आणि १ जून रोजी आपला उमेदवारी अर्ज भरतील, असे भाजपमधील सुत्रांनी सांगितले.


प्राजक्त तनपुरे


करण ससाणे

दरम्यान अहिल्यानगरची जागा भाजपकडे गेल्याने आ. संग्राम जगताप यांचे बंधू सचिन जगताप यांनी नाराजी व्यक्त केली आहे. माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, आम्ही दोन दिवस मुंबईत होतो. सर्व वरिष्ठांना भेटलो आहे. त्यांच्याशी आम्ही सविस्तरपणे बोललो आहे. अजून दोन दिवस आहेत. आमची सर्वप्रकारे तयारी आहे, असे ते म्हणाले.

कॉंग्रेसकडून श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे यांना एबी फॉर्म देण्यात आला आहे. मात्र, ससाणे हे निवडणूक लढवण्यास इच्छूक नाहीत. वरिष्ठ पातळीवर त्यांची मनधरणी सुरु आहे, असे कॉंग्रेसमधील सुत्रांनी सांगितले. अजून दोन दिवस शिल्लक आहेत. ऐनवेळी ससाणे यांच्या जागेवर दुसरा उमेदवारही दिसू शकतो, असे सांगण्यात आले.

# यावर्षीच्या पावसाळ्यात सरासरीच्या अवघा ९० टक्केच पाऊस बरसणार

### हवामान विभागाच्या नव्या अंदाजामुळे चिंता वाढली,'एल निनो'च्या सावटाचा परिणाम

मुंबई - देशावर ' एल निनो 'ची सावट असल्यामुळे नागरिकांची चिंता वाढली आहे. हवामान विभागाने जून महिन्यासाठी आणि संपूर्ण मोसमासाठी नवा अंदाज जाहीर केला आहे. २०२६ च्या मान्सूनसाठी हवामान विभागाने दीर्घकालीन अंदाज जाहीर केला असून यानुसार यंदा सरासरीच्या ९० टक्केच पाऊस होण्याची शक्यता आहे. यापूर्वी एप्रिल महिन्यात हा आकडा ९२ टक्के असेल असा अंदाज होता. पण आता हा आणखी खाली घसरल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठं संकट निर्माण झालं आहे.

आयएमडीने २९ मे रोजी जारी केलेल्या पत्रात जून महिन्यातचं 'एल निनो' सक्रिय होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. हळूहळू एल निनोचा प्रभाव वाढत जाण्याची शक्यता आहे. जून ते सप्टेंबरदरम्यान नैऋत्य मोसमी पाऊस सरासरीहून ९० टक्के होणार असल्याचा अंदाज आहे. यामध्ये चार टक्के कमी-जास्त परिणाम दिसू शकतो. यामुळे जून महिन्यात नेहमीपेक्षा अधिक प्रमाणात उष्णतेच्या तीव्र लाटा राहण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.

जून महिन्यात ईशान्य भारतातील पावसावर अधिक परिणाम दिसणार नसून सामान्य पाऊस होईल. पण मध्य आणि द्विपकल्पीय भारतात सरासरीपेक्षा कमी पाऊस होणार आहे. यामुळे महाराष्ट्रावर मोठा परिणाम होणार आहे. मध्य भारतावर याचा ४३ टक्के परिणाम होणार असून द्विपकल्पात ४५ टक्के परिणाम दिसून येणार आहे. जून २०२६मध्ये उत्तर प्रदेश, हरियाणा, पंजाब, बिहार, झारखंड, ओडिशा, छत्तीसगड, गुजरात, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगण, हिमाचल प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये उष्णतेच्या तीव्र लाटा असतील.

सध्या प्रशांत महासागरात एल निनोची परिस्थिती निर्माण होत आहे. ही प्रणाली भारतात नैऋत्य मोसमी पावसाच्या काळात पोहचण्याचा अंदाज आहे. याचा खरिपावर मोठा परिणाम होणार आहे.

### खरिप पिकाला फटका बसणार

पश्चिम आशियातील संघर्षामुळे अन्नधान्याच्या किंमती वाढलेल्या आहेत. भारताला महागाईच्या झळा बसत आहेत. कमी पावसामुळे शेतीच्या उत्पादनावर मोठा परिणाम होणार असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. येत्या काही आठवड्यात एल निनोची परिस्थिती उद्भवणार असून देशात उष्णताही वाढण्याची शक्यता आहे. यामुळे कृषी उत्पादनावर दबाव येऊ शकतो. वर्षाच्या उत्तरार्धात धान्य महागण्याची भीती आहे.

यावेळी ईशान्य भारतात सरासरीच्या ९४ ते १०६ टक्के पाऊस होणार आहे. पण देशातील शेतीवर अवलंबून असलेला भाग, म्हणजे मान्सून कोअर झोनमध्ये सरीसरीच्या तुलनेत कमी पावसाची नोंद केली जाणार आहे. याशिवाय हिंद महासागरातील द्विध्रुव सध्या तटस्थ आहे. संपूर्ण मान्सून हंगामात हे तटस्थच राहणार असल्यामुळे फारसा परिणाम होणार नाही. हवामान विभाग जुलैमधील पावसाचा अंदाज जुन महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात प्रसिद्ध करणार आहे.






# 'प्रवेशबंदी' तोडून शहरात घुसणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाईची मोहीम

### शहर वाहतूक शाखेकडून नाकाबंदी करत ४४ हजार रुपयांचा दंड केला वसूल

नगर - अहिल्यानगर शहरात सकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत अवजड वाहनांना प्रवेश बंदी असतानाही सर्रास वाहने शहरात प्रवेश करतात. त्यामुळे शहर वाहतूक शाखेच्या वतीने दोन दिवसांपासून कारवाईची मोहिम हाती घेण्यात आली आहे. या दोन दिवसात प्रवेशबंदी तोडून शहरात येणाऱ्या ४१ अवजड वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या वाहन चालकांकडून दोन दिवसात ४४ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांनी दिली.

शहरात अवजड वाहने आल्यानंतर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होती. या वाहतूक कोंडीवर मार्ग काढण्यासाठी शहरात अवजड वाहनांना प्रवेश करण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी मनाई केलेली आहे. दिवसा सर्व अवजड वाहने बायपास मार्गे नेण्यात यावी, शहरात माल घेवून येणाऱ्या वाहनांनी रात्री शहरात प्रवेश करावा, वाहतुकीचे नियम पाळावेत, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी बजावले आहेत. मात्र, तरीही काही वाहने ही प्रवेशबंदी तोडून शहरात प्रवेश करतात. अशा वाहनांवर शहर वाहतूक शाखेच्या वतीने २८ व २९ मे रोजी कारवाई करण्याची मोहिम हाती घेण्यात आली. त्यासाठी वाहतूक शाखेच्यावतीने छत्रपती संभाजीनगर मार्गावरील चेतन लॉन आणि पुणे महामार्गावर शिल्पा गार्डनजवळ नाकाबंदी लावण्यात आली. यावेळी शहरात प्रवेश बंदी असतानाही शहरात प्रवेश करणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला.

२८ मे रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी घातलेल्या प्रवेशबंदीचे उल्लंघन करणाऱ्या २७ अवजड वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, त्यांच्याकडून २५ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तर २९ मे रोजी १४ वाहनांवर कारवाई करुन त्यांच्याकडून १८ हजार ५०० रुपयांचा दंड

(छायाचित्र व मजकूर पान ७ वर)

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जेसीबीचे टायर पंक्चर काढण्याच्या वादातून लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने मारहाण

नगर – जेसीबीच्या टायरचे पंक्चर काढताना ट्यूब टाकण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका मजुराला आणि त्याच्या मुलाला लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केल्याची घटना पोखर्डी येथे घडली आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोखर्डी परिसरात नवनाथ आनंदा काळे हे मजुरीचे काम करतात. ते आरोपी कृष्णा परशुराम वारुळे याच्या जेसीबीच्या टायरचे पंक्चर काढत होते. त्यावेळी टायरमध्ये नवीन ट्यूब टाकावी लागेल, असे नवनाथ यांनी आरोपीला सांगितले. यावरून संतप्त झालेल्या कृष्णा याने 'तू मला आधी का सांगितले नाही' असे म्हणून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने आपल्या इतर साथीदारांना घटनास्थळी बोलावून घेतले.

त्यानंतर आरोपी परशुराम वारुळे याने नवनाथ यांना शिवीगाळ करत लोखंडी रॉडने त्यांच्या हातावर जोरदार प्रहार केला. दुसरीकडे, आरोपी सागर विश्वास देठे याने लाकडी दांडक्याने तर अनिल वाघुंडे याने नवनाथ व त्यांच्या मुलाला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या चौघांनी मिळून बाप-लेकाला जीवे मारण्याची धमकीही दिली. या घटनेनंतर नवनाथ काळे यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, पोलिसांनी कृष्णा वारुळे, परशुराम वारुळे, सागर देठे आणि अनिल वाघुंडे यांच्याविरुद्ध मारहाण व धमकीचा गुन्हा नोंदवला आहे.

# पुराचा धोका कमी करण्यासाठी सीना नदीचे रुंदीकरण आणि खोलीकरणाचे काम सुरु

## २० कोटी रुपयांच्या निधीतून होणार तीन किलोमीटरचे काम; पावसाळ्यापूर्वी महत्त्वाचे टप्पे पूर्ण करण्याचा प्रयत्न

नगर – शहरातून वाहणाऱ्या सीना नदीचे पात्र विस्तारित करण्यासाठी प्रशासनाने जोरदार मोहीम हाती घेतली असून, पुराचा धोका कमी करण्याच्या दृष्टीने नदीचे रुंदीकरण आणि खोलीकरण युद्धपातळीवर सुरू आहे. बुरुडगाव येथील बाबरमळा ते स्टेशन रोडवरील लोखंडी पुलापर्यंतच्या सुमारे तीन किलोमीटर अंतरात हे काम सुरू असून, यासाठी राज्य शासनाकडून २० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.



सीना नदीपात्रात रुंदीकरण व खोलीकरणाचे काम सुरु आहे. (छाया – लहू दळवी)

अहिल्यानगर शहरातून वाहणाऱ्या सीना नदीचे पात्र सुमारे १४ किलोमीटर लांबीचे असून, संपूर्ण नदीपात्राचे रुंदीकरण आणि खोलीकरण चार ते पाच टप्प्यांत करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात बुरुडगाव ते स्टेशन रोडवरील लोखंडी पूल या दरम्यान सुमारे तीन किलोमीटर परिसरातील काम सुरु करण्यात आले आहे. सीना नदीचे पात्र काही ठिकाणी २० मीटर तर काही ठिकाणी ४० मीटर इतके अरुंद झाले आहे. त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाला अडथळा होऊन नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पुराचे पाणी शिरते. ही बाब लक्षात घेऊन जेथे नदीचे पात्र अरुंद आहे, तेथे नदीचे पात्र आता ७० ते ८० मीटरपर्यंत रुंद करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. तसेच नदीपात्रातील गाळ काढणे, माती व लोकांनी टाकलेले बांधकामांचे साहित्य हटविणे, पात्राची खोली वाढविणे अशी कामे केली जात आहेत.

बुरुडगावपासून पुणे रोडपर्यंतचा टप्पा पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. सुमारे एक महिन्यापासून हे काम सुरू असून, पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त काम पूर्ण करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास जूनअखेरपर्यंत पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

मागील पावसाळ्यात अहिल्यानगर शहर आणि सीना नदीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे नदीला मोठा पूर आला होता. नदीपात्रातील गाळ, अतिक्रमणे आणि उथळ झालेल्या प्रवाहामुळे पाणी वाहून जाण्यात अडथळे निर्माण झाले होते. परिणामी, नदीकाठच्या अनेक वस्त्यांमध्ये पुराचे पाणी शिरले होते. सध्या सुरू असलेल्या रुंदीकरण आणि खोलीकरणाच्या कामामुळे नदीची पाणी वाहून नेण्याची क्षमता वाढणार असून, भविष्यातील पुराचा धोका लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा आहे. तसेच पात्र खोल झाल्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याची प्रक्रियाही अधिक वेगाने होणार आहे.

दरम्यान, सीना नदी पात्रातील अतिक्रमणांचा मुद्दाही गंभीर बनला आहे. गेल्या अनेक वर्षांत नदीकाठावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याने नदीचे नैसर्गिक पात्र अरुंद झाले आहे. काही ठिकाणी नदीपात्रात भराव टाकून शेड व इतर बांधकामे उभारण्यात आल्याने पाण्याच्या प्रवाहात अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे रुंदीकरण आणि खोलीकरणासोबतच नदीपात्राची हद्द निश्चित करणे आणि अतिक्रमणे हटविण्याची मागणी होत आहे.

# क्षुल्लक कारणावरून तरुणाला लोखंडी गजाने बेदम मारहाण

नगर – मित्रासोबत गावातील वेशीजवळील बारवेजवळ बसलेल्या एका १७ वर्षीय तरुणाला जुन्या कारणावरून वाद घालत बेदम मारहाण केल्याची घटना कामरगाव येथे घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात तेजस सुनील ठोकळ (रा. कामरगाव, ता.नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सोहम सुभाष आंधळे (रा. कामरगाव) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी हा मित्रासमवेत गावातील वेशीजवळ बसलेला होता. त्यावेळी तेथे आलेल्या आरोपी तेजस ठोकळ याने कोणत्याही कारणाशिवाय फिर्यादीच्या अंगावर थुंकून वाद घालण्यास सुरुवात केली. फिर्यादीने 'तू शिवीगाळ का करतोस?' असा जाब विचारला असता, आरोपीचा राग अनावर झाला. त्याने फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता, आरोपीने तिथेच पडलेला एक लोखंडी गज उचलून फिर्यादीच्या पाठीवर जोरात मारला. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे फिर्यादी प्रचंड घाबरला आणि स्वतःचा जीव वाचवण्यासाठी तिथून पळाला.

पळून जात असलेल्या फिर्यादीला आरोपीने मागून जोरात धमकावले. 'तुझ्या भावाला जाऊन सांग मी तुला मारले आहे, जर माझ्या नादी लागला तर तुला संपवून टाकीन, आम्ही असे भरपूर गुन्हे केले आहेत,' अशी थेट जीवे मारण्याची धमकी देऊन आरोपी तिथून पसार झाला. या मारहाणीत फिर्यादी तरुण जखमी झाला आहे. घटनेनंतर पीडित तरुणाने नगर तालुका पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली.

त्यानुसार पोलिसांनी आरोपी तेजस ठोकळ याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस अंमलदार रेपाळे करत आहेत.

# कचरा टाकण्यास विरोध केल्याने आई आणि मुलाला बेदम मारहाण

नगर – शहरातील मार्केट यार्ड परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ कचरा टाकण्याच्या कारणावरून झालेल्या वादात एका लोहार काम करणाऱ्या व्यक्तीला आणि त्यांच्या आईला लाकडी फळीने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मोहन विश्वनाथ चव्हाण (वय ३९, रा. आरणगाव, ता. नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे मार्केट यार्ड परिसरात लोहार कामाचे (घिसाडी काम) दुकान आहे. या दुकानाच्या परिसरात आरोपी विठ्ठल वरकड आणि त्याचा मुलगा विशाल विठ्ठल वरकड हे दोघे कचरा टाकत होते. त्यावेळी फिर्यादी चव्हाण यांनी येथे कचरा टाकू नका असे त्यांना सांगितले. याच कारणाचा राग मनात धरून दोन्ही आरोपींनी चव्हाण आणि त्यांच्या आईला लाथाबुक्क्यांनी आणि लाकडी फळीने बेदम मारहाण करून जखमी केले.

या घटनेनंतर पीडितांनी तात्काळ पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. कोतवाली पोलिसांनी आरोपी विठ्ठल वरकड आणि विशाल वरकड यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८ (१), ११५ (२) आणि ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार वाघमारे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यांवर छापा; २०० किलो गोमांस जप्त

नगर – एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैधपणे गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्यांवर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. जेऊर बायजाबाई (ता. नगर) येथे छापा टाकून पोलिसांनी सुमारे ६० हजार रुपये किमतीचे गोमांस आणि कत्तलीसाठी लागणारे साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२८ मे २०२६ रोजी दुपारी १२:०० वाजताच्या सुमारास मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, पोलीस पथकाने जेऊर बायजाबाई येथील अजीम शरीफ पठाण याच्या राहत्या घराच्या मागील बाजूला असलेल्या खोलीवर धाड टाकली. या ठिकाणी काही इसम गोवंशीय जनावरांची कत्तल करत असल्याचे पोलिसांना आढळले. पोलिसांची चाहूल लागताच आरोपी घटनास्थळावरून पसार झाले.

पोलिसांनी छापा टाकून घटनास्थळावरून सुमारे २०० किलो वजनाचे, ६० हजार रुपये किमतीचे गोवंशीय जातीच्या जनावरांचे मांस आणि कत्तलीसाठी वापरली जाणारी साधने जप्त केली आहेत.

याप्रकरणी अजीम शरीफ पठाण आणि अयान अजीम पठाण (दोघे रा. जेऊर बायजाबाई, ता. नगर) यांच्याविरुद्ध बीएनएस कलम ३२५, २७१, २७२ सह महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५ (क), ९ (अ), (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स.पो.नि. माणिक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल दिवटे करत आहेत.

# पैशांच्या व्यवहारातून तरुणाला लोखंडी रॉडने बेदम मारहाण

## बंगाल चौकी परिसरातील घटना, चौघांच्याविरुद्ध गुन्हा दाखल

नगर – पैशांच्या देवाणघेवाणीच्या कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणाला लाथाबुक्क्यांनी आणि लोखंडी रॉडने बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अमोल सुरेश घाटेशाही (वय ३०, रा. गवळीवाडा, भिंगार) असे मारहाणीत जखमी झालेल्या तरुणाचे नाव असून त्याने या प्रकरणी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हा वाद बांबू गल्ली, बंगाल चौकी परिसरात २८ मे रोजी घडला. फिर्यादी अमोल घाटेशाही आणि आरोपींमध्ये पैशांच्या व्यवहारावरून वाद झाला होता. या वादाचे रूपांतर पुढे मोठ्या भांडणात झाले. आरोपी साकीब आमिन अक्तार आणि रिहान आमिन अक्तार (दोघे रा. मोमिन गल्ली, भिंगार) यांनी त्यांच्या सोबत असलेल्या इतर दोन अनोळखी साथीदारांसह अमोल यांना गाठले. जुन्या वादाचा राग मनात धरून या चौघांनी अमोल यांना रस्त्यात अडवून बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.

भांडणादरम्यान आरोपींनी अमोल यांना अत्यंत गलिच्छ भाषेत शिवीगाळ केली आणि जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी लाथाबुक्क्यांसह लोखंडी रॉडने अमोल यांच्यावर जबर हल्ला चढवला. या अचानक झालेल्या हल्ल्यात अमोल गंभीर जखमी झाले आहेत. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि कोतवाली पोलीस ठाण्याचे पो. नि.संभाजी गायकवाड यांनी परिस्थितीचा आढावा घेतला.

या मारहाणीच्या घटनेनंतर अमोल यांनी तात्काळ पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. पोलिसांनी साकीब अक्तार, रिहान अक्तार आणि इतर दोन अनोळखी इसमांविरोधात गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात या करत आहेत.

# तीन ठिकाणी गावठी दारू अड्ड्यांवर पोलिसांची धडक कारवाई

## ८६ हजार रुपयांची अवैध दारू व रसायन जागेवरच नष्ट, तिघांवर गुन्हा दाखल

नगर – एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैधरित्या सुरु असलेल्या गावठी दारू अड्ड्यांवर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. नगर तालुक्यातील निमगाव घाणा आणि टाकळी खातगाव परिसरात सुरू असलेल्या या अवैध धंद्यावर छापा टाकून पोलिसांनी सुमारे ८६ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जागेवरच नष्ट केला असून, तीन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



नगर तालुक्यातील निमगाव घाणा आणि टाकळी खातगाव परिसरात गावठी दारू अड्ड्यांवर छापा टाकून कारवाई करताना एमआयडीसी पोलिसांचे पथक.

स.पो.नि. माणिक चौधरी यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार २८ मे रोजी एम आयडीसी पोलिसांच्या पथकाने निमगाव घाणा व टाकळी खातगाव येथे धाड टाकली. या कारवाईत पोलिसांनी रसायन मिश्रित गावठी दारू तयार करण्याचे साहित्य जप्त केले.

यामध्ये निमगाव घाणा येथे आरोपी राजू सखाराम गव्हाणे (वय ४५) याच्या घराजवळील शेडमध्ये ५० हजार रुपये किमतीचे १००० लिटर कच्चे रसायन आणि २० हजार रुपयांची २०० लिटर तयार दारू पोलिसांनी नष्ट केली. टाकळी खातगाव येथे आरोपी राजेंद्र विलास पवार (वय २२) याच्या घराजवळील ओढ्यात ५ हजार रुपये किमतीचे १०० लिटर कच्चे रसायन व ४ हजार रुपयांची ४० लिटर दारू नष्ट केली. तसेच टाकळी खातगाव परिसरातील आरोपी विनोद दिलीप पवार (वय २२) याच्या ठिकाणाहून ४ हजार रुपयांचे ८० लिटर कच्चे रसायन व ३ हजार रुपयांची ३० लिटर दारू जप्त करून नष्ट करण्यात आली.

या तिन्ही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्यावर महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५ (ई) अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एमआयडीसी पोलीस पुढील तपास करत आहेत. ही कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो. नि. माणिक चौधरी, उपनिरीक्षक विनोद परदेशी, पोलिस अंमलदार मुकुंद दुधाळ, किशोर जाधव, सचिन हरदास, अक्षय रोहोकले, सुरज देशमुख आणि उमेश शेरकर यांच्या पथकाने केली.

# लिलाबाई गुरप यांचे अल्प आजाराने निधन



नगर – चितळे रोड, पापय्या गल्ली येथील रहिवासी लिलाबाई रामचंद्र गुरप (वय ८२) यांचे २९ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. दत्तात्रय गुरप यांच्या त्या मातोश्री होत.

# नरेंद्र तांबे यांचे अल्प आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील नरेंद्र एकनाथ तांबे (वय ६२, रा.वॉर्ड नं.१, श्रीरामपूर) यांचे २९ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

वैभव तांबे, संदेश तांबे यांचे ते चुलते होत.

# दगडुलाल गुगळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – पाईपलाईन रोड येथील रहिवासी दगडुलाल बन्सीलाल गुगळे (मिरीवाला, वय ९२) यांचे २८ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अरुणलाल यांचे वडील तर सचिन, कांतीलाल यांचे ते आजोबा होत.

# सावेडीत ७९ वर्षीय वृद्धाचा घरावरून पडून दुर्दैवी मृत्यू

नगर – सावेडी परिसरातील नवले नगर भागात राहणाऱ्या एका ७९ वर्षीय वृद्धाचा राहत्या घराच्या गच्चीवरून खाली पडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना २८ मे रोजी रात्री घडली आहे. मृत व्यक्तीचे नाव पांडुरंग नामदेव जगदाळे (वय ७९, रा. नवले नगर, गुलमोहर रोड, सावेडी) असे आहे. पांडुरंग जगदाळे हे २८ मे रोजी सायंकाळी ७.१० च्या सुमारास राहत्या घराच्या गच्चीवरून अचानक खाली पडले.त्यांना तातडीने त्यांचे नातू निखिल संजय जगदाळे यांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.मात्र, रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला, असे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन शिंदे यांनी घोषित केले. यप्रकरणी तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल गांगर्डे करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# पूजेच्या नावाखाली महिलेची लाखोंची फसवणूक आणि अत्याचार

## भोंदूबाबासह तिघांविरोधात अंधश्रद्धा कायद्यासह अत्याचाराचा गुन्हा दाखल

नगर – पारनेर शहरात काळुबाई देवीच्या पूजेच्या नावाखाली एका शेतकरी महिलेची तब्बल ६ लाख ५९ हजार ६८४ रुपयांची आर्थिक फसवणूक करून तिच्यावर वारंवार अत्याचार करण्यात आल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. मतीमंद मुलगा बरा होईल, भावाचे लग्न जमेल, घरातील संकटे दूर होतील, असे आमिष दाखवत तिला अंधश्रद्धेच्या जाळ्यात ओढण्यात आले. यानंतर देवी रागावली तर मुलाचा जीव जाईल अशी भीती घालत आरोपीने तिच्यावर जबरदस्तीने शरीरसंबंध ठेवल्याचा गंभीर आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात राजू बन्सी दिवटे, त्याचा मुलगा शशिकांत राजू दिवटे (दोघेही रा. रुई छत्रपती, ता. पारनेर) आणि त्यांची सहकारी शोभा अविनाश तरटे (रा. बाबुर्डी, ता. पारनेर) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिला ही ४० वर्षीय शेतकरी असून ती पती आणि दोन मुलांसह राहत आहे. तिचा लहान मुलगा मतीमंद असल्याने अनेक दवाखान्यांत उपचार करूनही फरक पडत नव्हता. दुसरीकडे तिच्या भावाचे वय वाढूनही लग्न जमत नसल्याने संपूर्ण कुटुंब मानसिक तणावाखाली होते.याच काळात कोणीतरी महिलेला रुई छत्रपती येथील राजू दिवटे आणि त्याचा मुलगा शशिकांत दिवटे यांच्याबाबत माहिती दिली. हे लोक देवलशी असून त्यांना भविष्य कळते, घरातील अडचणींवर उपाय सांगतात, तसेच देवीच्या पूजेद्वारे समस्या दूर करतात, असे महिलेला सांगण्यात आले. त्यानंतर २०२० पासून महिला मुलगा आणि भावाला घेऊन आरोपींकडे जाऊ लागली.

आरोपींनी तुमच्यावर मांढरदेव येथील काळुबाई देवीची बाधा आहे असे सांगितले. ही बाधा दूर करण्यासाठी विशेष पूजा, होम-हवन आणि तंत्र-मंत्र करावे लागतील, असे सांगण्यात आले.यासाठी आरोपींनी महिलेला मोठी यादी दिली. त्यामध्ये विविध झाडांची लाकडे, तूप, काळा दोरा, नारळ, जवस, उडीद, काळे तीळ, लिंबू, बाहुल्या आदी वस्तूंचा समावेश होता. मुलगा बरा करण्यासाठी सलग वर्षभर पूजा करावी लागेल आणि त्यासाठी तीन ते चार लाख रुपये खर्च येईल, तर भावाचे लग्न जमवण्यासाठी दीड लाख रुपये लागतील, असे आरोपींनी सांगितले.

महिलेने साहित्य कुठून आणायचे, असा प्रश्न विचारल्यावर आरोपींची सहकारी शोभा तरटे हिने सर्व वस्तू माझ्याकडेच आहेत असे सांगून सुरुवातीलाच १० हजार रुपये घेतले.त्यानंतर चौधरी कॉम्प्लेक्स, पारनेर येथील आरोपींच्या निवासस्थानी काळुबाईच्या फोटोसमोर होम-हवन करण्यात आले. महिलेच्या म्हणण्यानुसार, आरोपी मंत्रोच्चार करत विविध वस्तू आगीत टाकत होते. पूजा झाल्यानंतर यामुळे फरक पडेल असे सांगून अंगारा दिला जात होता. तो अंगारा पाण्यात मिसळून पिण्यास सांगण्यात आले होते. या प्रकारामुळे महिला पूर्णपणे आरोपींच्या प्रभावाखाली गेली होती.

महिला दर आठवड्याला आरोपींकडे जात होती. जानेवारी २०२५ ते मार्च २०२६ या काळात पूजा, होम-हवन आणि विविध धार्मिक विधींच्या नावाखाली तिच्याकडून २ लाख ५६ हजार ६८४ रुपये उकळण्यात आले. ही रक्कम पारनेर येथील कॉम्प्युटर सेंटर येथून ऑनलाईन पद्धतीने आरोपींना पाठवण्यात आली होती. याशिवाय एप्रिल २०२६ मध्ये आणखी २ लाख रुपये रोख घेण्यात आले. दुसरीकडे महिलेच्या भावाकडूनही पूजा आणि लग्न जुळवून आणण्याच्या नावाखाली सुमारे ९३ हजार ५३० रुपये ऑनलाईन स्वरूपात घेतले गेले. त्यानंतर आणखी १ लाख रुपये रोख उकळल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे ही सर्व रक्कम पीडित महिला आणि तिच्या भावाने विविध बँकांकडून कर्ज काढून दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

यानंतर चौधरी कॉम्प्लेक्समधील फ्लॅटमध्ये नेऊन तुझ्या मुलाचा आजार पूर्णपणे बरा व्हायचा असेल, त्याच्या आयुष्यासाठी तुला माझ्यासोबत शरीरसंबंध ठेवावे लागतील असे आरोपीने सांगितले. महिलेने शरीरसंबंध ठेवण्यास नकार दिल्यानंतर आरोपीने तिच्या मुलाचा फोटो दाखवत मी काळुबाईची पूजा करून त्याचे तुकडे तुकडे करीन, देवी त्याला मारून टाकेल अशी भीषण धमकी दिल्याचा आरोप आहे.

### पैसे परत मागितल्यावर मारहाण व धमक्या

पूजा करूनही मुलाच्या प्रकृतीत किंवा भावाच्या लग्नाबाबत कोणताही फरक पडत नसल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने आरोपींकडे पैसे परत मागितले. मात्र आरोपींनी शिवीगाळ करत मारहाण केली आणि तक्रार केली तर समाजात बदनाम करू, सासरी कोणी ठेवणार नाही अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अखेर महिलेला आपण मोठ्या फसवणुकीचा बळी ठरलो असल्याचे लक्षात आले. तिने हा सर्व प्रकार आपल्या सासू-सासऱ्यांना सांगितला. त्यांनी तिला धीर देत पोलिसांकडे जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर महिलेने पारनेर पोलिस ठाण्यात सविस्तर फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ६४ (२) (एम), ११५ (२), ३५२, ३५१ (२), ३ (५) तसेच महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा २०१३ मधील कलम ३(२) आणि ३(३) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### जेवताना पाणी प्यावे का?

जेवताना पाणी प्यावे की नाही, हा प्रश्न अनेकांना पडतो. आपल्या आजी-आजोबांपासून आयुर्वेदापर्यंत सगळ्यांनी यावर काही ना काही सांगितले आहे. जेवण आणि पाणी यांचा संबंध पचनाशी जोडलेला आहे. जास्त पाणी प्यायले तर पचन मंदावते, आणि अजिबात न प्यायले तर घास अडकतो. म्हणून 'मध्यम मार्ग' हेच उत्तर योग्य ठरते. जेवताना पाणी पिणे पूर्णपणे अयोग्य नाही, पण त्याला मर्यादा आहेत. 'अति तिथे माती' या न्यायाने पाण्याचा अतिरेक टाळावा. घोट-दोन घोट पाणी पचनास मदत करते, पण ग्लासभर पाणी पचन बिघडवते. आपल्या शरीराची गरज ओळखून, आयुर्वेदाने सांगितलेला मध्यम मार्ग स्वीकारला तर आरोग्य उत्तम राहील. कारण शेवटी आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. याचा अर्थ जेवताना पाणी पूर्णपणे वर्ज्य करावे असा नाही. घास कोरडा लागल्यास किंवा तिखट लागल्यास एक-दोन घोट पाणी पिणे आवश्यकच आहे. त्यामुळे अन्न ओले होते आणि गिळायला सोपे जाते. आयुर्वेदात सांगितले आहे की जेवणाच्या मध्ये थोडे पाणी प्यायल्याने अन्नाचे नीट मिश्रण होते आणि पचनाला मदत होते. मात्र हे पाणी कोमट किंवा साधे असावे, फ्रिजमधले गार नसावे तरच लाभ होतील.

## पाककला

### मोतीचूर चीज केक

**साहित्य :** डायजेस्टिव्ह बिस्किटे २०० ग्रॅम, बटर ८० ग्रॅम, क्रीम चीज ४०० ग्रॅम, पिठी साखर १०० ग्रॅम, व्हिपिंग क्रीम २०० मिली, व्हॅनिला १ चमचा, लिंबू रस १ चमचा, जिलेटिन १० ग्रॅम, मोतीचूर लाडू ६-८, पिस्ता २ चमचे, केशर १० काड्या

**कृती :** बिस्किटे + बटर मिक्स करून टिनमध्ये थापा, २० मिनिट फ्रीज करा. जिलेटिन गरम पाण्यात विरघळवा. क्रीम चीज + साखर फेटा, क्रीम, व्हॅनिला, लिंबू रस घाला. जिलेटिन मिक्स करून बेसवर ओता. ६-८ तास फ्रीजमध्ये सेट करा. वर मोतीचूर चुरून घाला, पिस्ता केशराने सजवा. थंड सर्व्ह करा.

## वास्तू

### मास्टर बेडरुम संबंधी

* मास्टर बेडरूम घराच्या नैऋत्य कोपऱ्यात म्हणजे दक्षिण-पश्चिम दिशेला असावी.

* मुलांची बेडरूम पश्चिम किंवा वायव्य दिशेला चालेल.

* झोपताना डोके दक्षिणेकडे किंवा पूर्वेकडे असावे. उत्तरेकडे डोके करून कधीही झोपू नये.

* बेड भिंतीला टेकून ठेवा पण बेडच्या मागे बाथरूमची भिंत नसावी. बेड दरवाजा समोर थेट येणार नाही याची काळजी घ्या.

* बेडजवळ मोबाईल, लॅपटॉप, टीव्ही कमीत कमी ठेवा.

## सौंदर्य

* २ चमचे दह्यात अर्धा लिंबू पिळा. केसांच्या मुळांना लावून ३० मिनिटांनी धुवा. आठवड्यातून २ वेळा करा.

* ताजी कोरफड पानातील गर काढून टाळूला मसाज करा. १ तास ठेवून शॅम्पू करा. कोरफड फंगल इन्फेक्शन मारते.

* मूठभर कडुलिंबाची पाने उकळून घ्या. पाणी थंड झाल्यावर शेवटच्या पाण्यासाठी वापरा. कोंडा परत येत नाही.

## सल्ला

कुकरमध्ये भात, डाळ, भाजी एकत्र शिट्ट्या करा. वेगवेगळी भांडी ठेवून वेळ आणि गॅस दोन्ही वाचेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. ३० मे २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, विशाखा १३।२१, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २९ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** आज नवीन काम सुरू होईल. वरिष्ठांकडून कौतुक होईल. आर्थिक लाभ होईल.

**वृषभ :** आज जवळच्या व्यक्तीशी वाद होण्याची शक्यता. व्यवसायात नवीन संधी मिळेल. जुन्या मित्राची भेट होईल.

**मिथुन :** आज अभ्यासात लक्ष लागेल. नोकरीची चांगली बातमी येईल. प्रेमसंबंधात गोडवा वाढेल. घरात धार्मिक कार्य होईल.

**कर्क :** आज मन अस्वस्थ राहील. अडकलेले पैसे परत मिळतील. थकवा जाणवेल.

**सिंह :** आज तुमच्या बोलण्याचा प्रभाव पडेल. मान-सन्मान वाढेल. नवीन ओळखी होतील. डोकेदुखी होईल.

**कन्या :** आज दिवस कामात जाईल. टार्गेट पूर्ण होईल. घरासंबंधी महत्त्वाचा निर्णय होईल.

**तूळ :** आज भागीदारीत फायदा होईल. कोर्टाची कामे मार्गी लागतील. जोडीदाराची साथ मिळेल.

**वृश्चिक :** आज स्पर्धेत यश मिळेल. शत्रूवर मात होईल. कर्ज फेडले जाईल. गुडघेदुखी जाणवेल.

**धनु :** आज मुलांकडून आनंदाची बातमी मिळेल. प्रवास होईल. शिक्षणात लाभ होईल.

**मकर :** आज घरात आनंदाचे वातावरण राहील. मालमत्तेतून फायदा होईल. मन शांत राहील.

**कुंभ :** आज धाडस वाढेल. भावंडांची मदत मिळेल. छोटा प्रवास होईल. सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळेल.

**मीन :** आज आर्थिक स्थिती सुधारेल. बोलण्याने कामे होतील. कुटुंबात शुभकार्य घडेल.

## शब्दगंध क्र. ७४४० सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ | ■ |
| ७ | | | ■ | ८ | | | ९ |
| १० | | ■ | ११ | | | ■ | |
| १२ | | १३ | | | ■ | ■ | |
| ■ | ■ | १४ | | ■ | ■ | १५ | |
| १६ | १७ | | ■ | १८ | १९ | | ■ |
| २० | | | २१ | ■ | | ■ | २२ |
| ■ | २३ | | | | | | |

**आडवे शब्द :-** १) लहान मुलांच्या गोष्टीतील गाव किंवा शहर ७) पाण्यात राहणारा एक हिंस्र प्राणी; मगर; एक रास ८) काहीसा वेडा; खुळचट १०) पैसा; अडका ११) मुसलमान धर्मगुरूने काढलेला आदेश १२) एकेक बाब घेऊन १४) मोठी दरी १५) रामायणातील किष्किंधानगरीचा वानरराज; सुग्रीवाचा भाऊ; रक्षणकर्ता १६) भोजनास बसलेल्या अनेक लोकांची रांग १८) सरळ नसलेला; वक्र २०) सुंदर; रमणीय २३) रिकामी खटपट; पंचाईत

**उभे शब्द :-** १) विधानसभा किंवा विधान परिषदेचा सभासद २) चकितपणा; चकितपणाने ३) पलीकडे; झाडाखालचा ओटा ४) नव्याने; अलीकडे; अलीकडचे ५) तांब्या ६) स्वाद; गोडी; चव ९) राखण; रक्षा ११) तुषार; कारंजे व त्यातून उडणारे पाणी १३) मदत करणारे १५) अनेक कुटुंबे राहत असलेले मोठे घर १६) चिखल; राडा १७) जाणे; प्रस्थान करणे १९) चाप; कोदंड; धनुष्य २१) साधू, संन्यासी २२) भक्ती; किंमत; दर; अंत:करणाची स्थिती

### शब्दगंध क्र. ७४३९ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ज | रा | सं | ध | ■ | मो | ह | र |
| ग | ■ | प | ड | सा | द | ■ | वि |
| त | गा | दा | ■ | व | ■ | द | वा |
| ■ | य | ■ | न | ट | ना | ग | र |
| अ | रा | ज | क | ■ | न | ड | ■ |
| मा | न | ■ | ला | य | क | ■ | क |
| वा | ■ | ठे | का | ■ | ■ | ओ | टी |
| स्था | ■ | च | र | ण | र | ज | ■ |

### फिल्मीचक्कर क्र. १२३८ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क | भी | खु | शी | क | भी | ग | म |
| रि | ■ | दा | ■ | री | ■ | या | द |
| ना | ■ | ग | ज | ब | ■ | ■ | र |
| क | ■ | वा | ■ | ■ | ■ | सा | ■ |
| पू | ■ | ह | म | तो | ते | रे | ■ |
| र | वि | ■ | ■ | ह | ■ | ग | ये |
| ■ | क्षा | ■ | ■ | फा | ■ | म | ■ |
| आ | स | पा | स | ■ | स | प | ना |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** पडलात तरी चालेल, पण पुन्हा उठण्याची हिम्मत हरवू नका

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### विमान एवढे जड असूनही हवेत कसे उडते?

विमानाचे वजन कित्येक टन असते तरी ते सहज आकाशात उडते. याचे कारण म्हणजे विज्ञानाचे नियम आणि इंजिनिअरिंगची कमाल. विमान हवेत उडताना चार मुख्य शक्ती काम करत असतात. पहिली शक्ती म्हणजे वजन. पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण प्रत्येक वस्तूला खाली खेचते. विमानाला पण खाली खेचले जाते. दुसरी शक्ती म्हणजे उचल. ही शक्ती वजनाच्या अगदी विरुद्ध काम करते आणि विमानाला वर ढकलते. तिसरी शक्ती जोर असते जी इंजिनमुळे मिळते आणि विमानाला पुढे नेते. चौथी शक्ती रोध असते. हवा विमानाच्या हालचालीला अडथळा आणते त्याला रोध म्हणतात.

विमानाचे पंख हे सगळ्यात महत्त्वाचे असतात. पंख सरळ सपाट नसतात. त्यांचा आकार विशेष असतो ज्याला एअरफॉइल म्हणतात. पंखाचा वरचा पृष्ठभाग थोडा वक्राकार असतो आणि खालचा भाग जवळजवळ सपाट असतो. जेव्हा विमान धावपट्टीवरून वेगाने धावते तेव्हा हवा पंखांना छेदत पुढे जाते. वरच्या बाजूने जाणाऱ्या हवेला जास्त अंतर कापावे लागते. त्यामुळे तिचा वेग वाढतो. बर्नौलीचे तत्व सांगते की जिथे हवेचा वेग जास्त तिथे दाब कमी असतो. म्हणून पंखाच्या वर हवेचा दाब कमी होतो. पंखाखालची हवा मात्र कमी वेगाने जाते म्हणून तिथे दाब जास्त असतो.

हा वरचा कमी दाब आणि खालचा जास्त दाब यांच्यातील फरक विमानाला वर उचलतो. यालाच लिफ्ट किंवा उचल म्हणतात. उचल तयार होण्यासाठी वेग लागतो. तो वेग विमानाच्या इंजिनमधून मिळतो. जेट इंजिन प्रचंड शक्तीने हवा मागे ढकलते. न्यूटनच्या नियमानुसार जेव्हा इंजिन हवा मागे ढकलते तेव्हा तितक्याच ताकदीने विमान पुढे ढकलले जाते. यालाच थ्रस्ट किंवा जोर म्हणतात. विमानाचा वेग ताशी २५० ते ३०० किलोमीटर झाल्यावर इतकी उचल तयार होते की ती विमानाच्या वजनापेक्षा जास्त होते.ज्याक्षणी उचल वजनावर मात करते त्याक्षणी विमानाचे चाक जमीन सोडते आणि ते हवेत झेपावते. हवेत असताना पायलट इंजिनचा जोर कमी जास्त करतो. पंखावरचे फ्लॅप्स वर खाली करून उचल नियंत्रित करतो. विमानाचा निमुळता आकार हवेचा रोध कमी करतो. म्हणून इंधन वाचते आणि वेग टिकून राहतो. उतरताना पायलट जोर कमी करतो आणि फ्लॅप्सचा वापर करून उचल कमी करतो. त्यामुळे विमान हळूहळू खाली येते.

अशा प्रकारे वजन, उचल, जोर आणि रोध या चार शक्तींचा योग्य मेळ साधला की शेकडो टन वजनाचे विमान पक्ष्याप्रमाणे हवेत तरंगते. फक्त पंखाचा आकार, इंजिनची ताकद आणि विज्ञानाचे नियम यामुळे हे शक्य होते. म्हणूनच आज आपण एका देशातून दुसऱ्या देशात काही तासांत विमानाने जाऊ शकतो.

### आशेचा दिवा

एका शांत खोलीत टेबलावर चार मेणबत्त्या जळत होत्या. त्यांची मंद प्रकाशात कुजबुज सुरू होती. पहिली मेणबत्ती म्हणाली, मी शांती आहे. आजकाल जगात मला कोणीच विचारत नाही. युद्ध, भांडण, राग यामुळे मी जास्त काळ टिकू शकत नाही. असे म्हणून ती विझून गेली.

दुसरी मेणबत्ती उसासा टाकत म्हणाली, मी विश्वास आहे. माझ्याशिवाय जग चालत नाही पण आता लोक एकमेकांवर विश्वास ठेवत नाहीत. मित्र मित्राला फसवतो. म्हणून मला पण जावे लागेल. असे म्हणून विश्वासाची ज्योत पण मालवली.तिसरी मेणबत्ती दुःखी होऊन म्हणाली, मी प्रेम आहे. माझ्यात सर्वांना जोडण्याची ताकद आहे. पण आज लोकांना माझ्यासाठी वेळच नाही. पैसा आणि स्वार्थ यांच्यामुळे मी एकटी पडले आहे. असे बोलून प्रेमाची मेणबत्ती पण विझली.

खोलीत आता अंधार पसरला होता. इतक्यात एक लहान मुलगा खोलीत आला. त्याने तीन विझलेल्या मेणबत्त्या पाहिल्या आणि तो रडू लागला. तो म्हणाला, तुम्ही विझायला नको होते. तुमच्या प्रकाशाशिवाय मी कसा राहू?

तेव्हा चौथी मेणबत्ती बोलली, बाळा, घाबरू नकोस. मी आशा आहे. मी जिवंत आहे तोपर्यंत कोणतीच गोष्ट संपलेली नसते. माझ्या ज्योतीने तू इतर तिन्ही मेणबत्त्या पुन्हा पेटवू शकतोस. मुलाच्या चेहऱ्यावर हसू आले. त्याने आशाच्या मेणबत्तीने शांती, विश्वास आणि प्रेम या तिन्ही मेणबत्त्या पुन्हा पेटवल्या. खोली पुन्हा प्रकाशाने उजळून निघाली.

तात्पर्य : आयुष्यात कितीही अंधार आला तरी आशेचा दिवा कधीच विझू देऊ नका. जोपर्यंत आशा जिवंत आहे तोपर्यंत शांती, विश्वास आणि प्रेम परत मिळवता येते.

## जीवन का अमृत (भाग १)



वस्तुओं को आत्मा के स्तर से देखते हैं। उनके लिए मौत का कोई डर नहीं रहता। तो अब आप देखें कि कितना महत्वपूर्ण है, शरीर से एकदम ऊपर आना और परलोक से जुड़ना। आपके पास ऊपर जाने का रास्ता है; अब केवल प्रश्न है सत्गुरु के कहे अनुसार आध्यात्मिक अभ्यासों में समय देने का, सही प्रकार से, बिना किसी जल्दबाजी या एक या दूसरी वस्तु को पाने की चाहत के और सब कुछ सिर पर कार्यरत सत्गुरु पर छोड़कर ।

अगर आप सही प्रकार से भजन-अभ्यास में नियमित रहेंगे, तो आप दिन-प्रतिदिन तरक्की करेंगे। इस उन्नति में सहायक या बाधक बनने में हमारे पुराने और वर्तमान कर्मों के फल बहुत महत्वपूर्ण हैं।

### अवचेतन

आप यह महसूस करते होंगे कि बीते हुए समय के मुकाबले, अब आपने काफी उन्नति की है एवं और अधिक उन्नति आपका इंतजार कर रही है।

आपके सिर पर गुरू-सत्ता कार्यरत है और आपके अंतर में सच्चे इंसान को जगा रहीं है। जो सपने आप देखते हैं, वे अवचेतन (subconscious) मन की प्रतिक्रियाएँ हैं. जो कि भरा पड़ा है अतीत के प्रभावों से, दिन भर के आतंक से और भविष्य की आशंकाओं से ।

यदि आप कुछ देर सिमरन करें और सत्गुरु की मधुर याद में रहें और रात में सोने से पहले यह आपका आखिरी काम हो तो कुछ समय बाद सपने आपको तंग करना बंद कर देंगे।

प्रेम न तो खेतों में उगता है, न ही इसे किसी औषधि विक्रेता की दुकान से खरीदा जा सकता है, यह तो एक प्रेरणा है, जो कि प्रेम से ओत-प्रोत इंसान (सत्गुरु) की आँखों से मिले उभार से जागृत होती है, प्रज्वलित होती है। एक और तरीका है, हालाँकि कम प्रभावशाली है; जिसको आप प्रेम करना चाहते हो, उसे सदा याद करो। यह लगातार याद धीरे-धीरे प्रेम में बदल जाएगी। यह प्रेम चौतरफा फायदा देगा।

यह सदा आपके मन को सत्गुरु की ओर लगाए रखेगा। जब यह तीव्र होगा, तो आप शारीरिक-चेतनता से ऊपर आना शुरू कर दोगे। दुनिया की तलवार एक वस्तु को काटकर दो कर देती है, पर प्रेम की तलवार ऐसी है, जो कि दो दिलों को जोड़कर एक कर देती है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

शिवानीदीदी : तुम्ही त्यांच्यावर दबाव आणू शकत नाही. तुम्ही दुसऱ्या आत्म्याच्या संपर्कात आहात हे माहीत असलं की ते स्वीकारणं अधिकच सोपं होतं. जेव्हा तुम्ही विचार करता, मी मोठा आहे, तेव्हा, इतरांनी माझं ऐकलंच पाहिजे असं तुम्ही समजता. जेव्हा तुमचा विचार, मी - एक आत्मा मी माझा मालक आहे असा बदलतो, त्यानंतर तुम्ही तुमच्या सुंदर गुणांच्या माध्यमातून प्रतिसाद देता.

सुरेश ओबेरॉय : जसं मी माझा मूळ स्वभाव विसरलो तसाच इतरही त्यांचे स्वभाव विसरले असतील हेही कदाचित मला जाणवेल. त्या वेळी मी त्यांच्याबद्दल मतं बनवणार नाही.

शिवानीदीदी : अगदी बरोबर. आत्म्याकडे सगळ्या प्रकारचे संस्कार असतात, हे आता आपल्याला माहीत आहे.

या ठिकाणी तुम्ही एक प्रेमळ आणि शांत आत्मा आहात. तुमच्या कुटुंबातील सदस्यांबरोबर तुम्ही याच सजगतेने वागाल. तुमच्या समोर असलेला आत्मा कदाचित एका लहान मुलामध्ये असेल, पण त्याने ग्रहण केलेला संस्कार जर रागाचा असेल तर ते

### ध्येय

मूल त्याच पद्धतीने बोलेल. असं असूनही जर तुम्ही विचार केला की ते एक लहान मूल आहे आणि मी वडील, ते छोटं आणि मी मोठा आहे, म्हणून त्याने विशिष्ट प्रकारेच वागलं पाहिजे, तर तुम्ही दुःख निर्माण कराल आणि असं करणं स्वाभाविक आहे असं तुम्हाला वाटेल. प्रत्येक संभाषणात तुम्ही दुखावले जाल आणि मग तुमचं वागणं पुनरावृत्तीची पुनरावृत्ती असेल. 'बीइंग लव्ह'च्या जागी तुम्ही 'बीइंग हर्ट' व्हाल आणि तुमच्याकडून हेच दुसऱ्यांकडे प्रसारित होईल, पाठवलं जाईल.

सुरेश ओबेरॉय : आणि मग मी माझ्या ध्येयापासून लांब जाईन.

शिवानीदीदी : हो. आणि हे सगळं, मी कोण आहे, या प्रश्नाचं तुमचं उत्तर चुकीचं असल्यामुळे घडेल.

मी, बीइंग, दिवसभर प्रेम अनुभवेन. जेव्हा आपण आपली मूळ ओळख विसरतो आणि एखादं पद, भूमिका किंवा प्रतिष्ठा यांना स्वतःची ओळख समजतो तेव्हा प्रेमाचा हा अनुभव आपल्याला घेता येत नाही. कारण आपण भूमिकेला ओळख बनवतो आणि आपल्याकडे अपेक्षांची मोठी यादी तयार होते. ह्याउलट, जेव्हा 'मी एक आत्मा आहे' या बाबत आपण सजग होतो तेव्हा इतरांशी कसं वागलं पाहिजे याचं आपण स्मरण ठेवतो.

जर तुम्ही डॉक्टर असाल तर तुमच्यातही तीच भावना जागृत असेल. जर कोणी आजारी पडलं, तर तुम्ही त्याच्यावर उपचार कराल. कारण तुमच्यात तीच भावना आणि विचार जन्म घेतील. समजा, चेतनेच्या अभावी, एक डॉक्टर असूनही तुम्ही हे विसरता की तुम्ही कोण आहात. मग भलेही तुमच्या समोर कोणाला दुखापत झाली तरीही तुम्ही त्याच्यावर उपचार करणार नाही. खोट्या चेतनेमुळे, जाणिवेमुळे सगळंच बदलेल.

सुरेश ओबेरॉय : परंतु खोट्या ओळखीत, प्रतिमेत अडकण्याची मुळं खूप खोलवर रुजलेली आहेत. गतजन्मांपासूनच ती आपल्या बरोबर आली आहेत. (क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

पेशंट : डॉक्टर, मला विसरण्याचा आजार झालाय.

डॉक्टर : कधीपासून?

पेशंट : मला आठवत नाही

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

**प्रश्न :** ऑलिम्पिक खेळ किती वर्षांनी भरतात?

- ४ वर्षांनी

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

### कोबी

पालेभाजी असूनही तशी न वाटणारी ही भाजी अनेकांना फळभाजीच वाटते. कोबीच्या गड्ड्यामध्ये पानावर पाने चिकटलेली असतात. त्यामुळे कोबीच्या पानांचा आकार गोल चेंडूसारखा असून, घट्ट वजनाने जड व रंगाने पांढरट हिरवा असतो. मराठीमध्ये 'कोबी', हिंदीमध्ये 'बंद गोभी', संस्कृतमध्ये 'शाकप्रभेद', इंग्रजीमध्ये 'कॅबेज', तर शास्त्रीय भाषेमध्ये 'ब्रासिका ओलेरासिया' (ईरीीळलर जश्रशीरलशर) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या कोबीला पानांवर पाने चिकटलेली असल्यामुळे शतपर्वा असेही म्हणतात. कोबी हा क्रुसिफेरी या कुळातील आहे.

कोबी ही भाजी प्राचीन काळात भारतात प्रचलित नव्हती. युरोपियन लोकांनी ही भाजी भारतात आणली. भारतात कोबीचे पीक सर्वत्र घेतले जाते. सहसा हिवाळी पीक म्हणून त्याच्या बीपासून रोपे तयार करून लागवड केली जाते. पांढरट-हिरवा व लाल-जांभळा अशा दोन प्रकारच्या कोबीच्या जाती आहेत.

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार : कोबी हा मधुर, वीर्यवर्धक, शीतल, दीपक, पाचक, वातप्रकोपक व कफनाशक

आधुनिक शास्त्रानुसार : कोबीमध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, 'क' जीवनसत्त्व हे घटक जास्त प्रमाणात आहेत, तर 'अ' व 'ब' जीवनसत्त्वेही थोड्या प्रमाणात आहेत. त्याचबरोबर प्रथिने, आर्द्रता, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थही आहेत.

उपयोग : १) कोबी मधुर गुणात्मक, शीत वीर्यात्मक, दीपक, पाचक असल्यामुळे प्रसूती झालेल्या एखाद्या मातेला दूध कमी येत असल्यास कोबीचा आहारात वापर करावा. यामुळे मातेचे दूध नक्की वाढते. आतड्यांचा व आमांशयाचा आंत्रव्रण (अल्सर) टाळण्यासाठी कोबीचा रस सेवन करावा.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# सीए प्रा. शंकर अंदानी यांचा जागतिक विक्रम; एकाच दिवशी होणार १०६ पुस्तके प्रकाशित

## ‘आई’ विषयावर ५१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह

नगर – अहिल्यानगरचे सुपुत्र सीए डॉ. प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांनी जागतिक स्तरावर नवा इतिहास घडविला आहे. एकाच दिवशी तब्बल १०६ स्वलिखित पुस्तके प्रकाशित करण्याचा विक्रम त्यांनी आपल्या नावावर नोंदविला असून, आई या विषयावर ५१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याची ऐतिहासिक कामगिरीही त्यांनी केली आहे.


शंकर अंदानी

साहित्य, समाजकार्य आणि विक्रमांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सीए शंकर अंदानी यांच्या या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय स्तरावरील लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स तसेच भारतातील प्रसिद्ध इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स या संस्थांनी घेतली असून त्यांच्या कार्याची अधिकृत नोंद होणार आहे.

मा की ममता, मा अनेकता की शक्ति या नावाने प्रकाशित होत असलेल्या भव्य हिंदी काव्यसंग्रहात संपूर्ण भारतातील १४० कवींनी लिहिलेल्या कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. तब्बल ५१२१ कवितांचा हा संग्रह जगातील सर्वात मोठा मातृत्वविषयक हिंदी काव्यसंग्रह मानला जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात साहित्य संकलन आणि संपादनाचे कार्य आजवर जगात कुणीही केले नसल्याचा दावा करण्यात येत आहे.

याचबरोबर सीए शंकर अंदानी यांनी स्वतः लिहिलेल्या एकूण १२१०० कवितांचे विविध पुस्तकांमध्ये प्रकाशन होत असून, हा देखील एक जागतिक विक्रम ठरत आहे. साहित्यविश्वात सर्वाधिक कविता प्रकाशित करण्याचा मान देखील त्यांच्या नावावर नोंदविला जात आहे. मराठी साहित्य क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. वडील बाबा अबोल जीवनाचे कोडे या नावाने महाराष्ट्रातील ८० कवींच्या ११६१ कवितांचे संकलन असलेला मराठी कवितासंग्रह प्रकाशित होत आहे. तसेच बहिण माझी प्रिय ताई या नावाने बहिणीवरील ११६१ कवितांचा स्वतंत्र संग्रह प्रकाशित केला जात आहे.

या सर्व उपक्रमांमुळे एकाच दिवशी तब्बल पाच जागतिक विक्रम सीए शंकर अंदानी यांच्या नावावर नोंदविले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सदर भव्य प्रकाशन सोहळा ३० मे २०२६ रोजी पुणे येथे होणार असून, विविध क्षेत्रातील नामवंत राजकीय नेते, साहित्यिक, लेखक, कवी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

सीए शंकर अंदानी हे केवळ साहित्यिक नसून समाजसेवक म्हणूनही त्यांनी मोठे कार्य केले आहे. अनेक मंदिरे, धर्मशाळा, सामाजिक संस्था, चर्च, मस्जिद तसेच विविध सामाजिक संघटनांचे आर्थिक व करसल्लागार कामकाज त्यांनी अत्यंत अल्प दरात किंवा विनामूल्य केले आहे. २०२२ मध्ये त्यांनी ३६४ मंदिरे, मस्जिद, चर्च आणि सामाजिक संस्थांचे कामकाज केल्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्सने घेतली होती. याबाबतची माहिती संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स ही संस्था देशभरातील उल्लेखनीय कार्य आणि विक्रमांची काटेकोर तपासणी करूनच नोंद करते. अत्यंत मर्यादित व्यक्तींना या संस्थेकडून अधिकृत मान्यता दिली जाते. त्यामुळे सीए शंकर अंदानी यांच्या कार्याला मिळालेली ही दखल विशेष महत्त्वाची मानली जात आहे.

सीए शंकर अंदानी यांना यापूर्वीही अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सन्मान प्राप्त झाले आहेत. युनायटेड नेशन अमेरिका तसेच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष कार्यालयाकडून त्यांना मेडल ऑफ एक्सलन्स हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या नावावर आतापर्यंत तब्बल ३१८० राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कारांची नोंद असून, ११५ जागतिक विक्रम आणि १५० मानद डॉक्टरेट मिळाल्या आहेत. व्यवसायाने सनदी लेखापाल असलेले सीए शंकर अंदानी हे श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डी येथे मागील १८ वर्षांपासून करसल्लागार म्हणून कार्यरत होते. तसेच अहिल्यानगर महानगरपालिकेचे मागील २० वर्षांपासून करसल्लागार म्हणून ते कार्य करत आहेत. अनेक शासकीय संस्था, बँका आणि पतसंस्थांचे ते लेखापरीक्षक व करसल्लागार म्हणूनही कार्यरत आहेत.

त्यांच्या या अभूतपूर्व कार्याबद्दल शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे, माजी खासदार सदाशिव लोखंडे, संगमनेरचे आ. सुधीर तांबे, अहिल्यानगरचे खासदार निलेश लंके, आमदार संग्राम अरुणकाका जगताप, अहमदनगर सिंधी समाज अध्यक्ष महेश मध्यान आदींनी अभिनंदन केले आहे. साहित्य, समाजकार्य, विक्रम आणि सामाजिक बांधिलकी या सर्व क्षेत्रांमध्ये सातत्याने कार्यरत राहून सीए डॉ. प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांनी अहिल्यानगरचे नाव राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आलो तुझ्या पायापाशी।

संकलन: दिशान फिचर्स




आता सायंकाळ झाली. वाट चुकली. अंगातली शक्ती क्षीण झाली. मुक्कामाला पोहोचण्याची आशा मावळली. हिंस्त्र श्वापदांची आरोळी व अशुभ घुबडाचे धुत्कार ऐकू आले कानी. भय दाटले मनी. एका वळणावर तो कुणी भेटला होता. डावीकडे नव्हे, उजवीकडे जा म्हणाला. पण त्यामुळे पाऊल नको त्या दिशेकडे वळे । बुद्धी चळे । पण तेव्हा नाही थांबलो. मुक्कामाकडे नेणारा मार्ग दाखवणाऱ्यालाच हसलो. फार मोठी चूक करुन बसलो। दुर्बुद्धीपायी फसलो. आता जीवनाला कंटाळलो.

आधार गमावून आता निराधार भटकतो आहे. केवळ उन्मत्त बनून वाट हरवून बसलो आहे. अंतरात्म्याकडे पाठ फिरवून केवळ धनलालसा व कामवासना यांनाच सामोरे गेलो आहे. विवेक बाजूला सारून दुष्कर्माला सदा आचरणात आणत गेलो आहे. तरी पण उशिरा का होईना, आता भानावर आलो आहे हे हृदयांच्या परमेश्वरा, मला आश्रय दे. सद्बुद्धी दे. पश्चातापाने पोळलेल्या मनाला शांती दे, सारलेत आता मी बाजूला सगळे स्वार्थाचे पाश, त्यापायीच झाला माझा नाश. आता तरी टळू दे विनाश. अंतरीचा आत्मा उदार आहे. शरणागतवत्सल आहे. सत्प्रवृत्ती जोपासेन. दुर्बुद्धी टाळेन. माणुसकीने वागेन. मी माझ्याशी आता प्रामाणिक असेन. हृदयीचा ईश्वर सदा आठवेन. सर्व माणसांच्या कल्याणासाठी झटेन. आता कळिकाळाचेही भय नुरेल.

सदा वाईट विचार मनात. पण आता समज आली. तुझे स्मरण झाले सगळे तुझ्या चरणी अर्पिले। तू हवी ती शिक्षा कर किंवा क्षमा कर. अधिकार तुझा आहे. सगळ्या प्राणिमात्रांवर हे अंतरात्मा, तुझीच सत्ता आहे. तुला मी शरण आले आहे. आता तूच मला वाचव.

एक हितोपदेशकारक कहाणी आहे. एका सिंहाने शिकार केली. प्राणी फस्त केला. पण त्या प्राण्याचं हाड आड आले. ते दाढेत रुतून बसले. सिंहाला यातना होऊ लागल्या. तेवढ्यात लांब मानेचा बगळा दिसला. सिंह त्याकडे धावला. बगळा गर्भगळित झाला. डोळे मिटून बसला. सिंह आता खाणार, यात संशय कुठला ?

पण सिंह जवळ येऊन स्वस्थ उभा राहिला. बगळ्या, माझ्या दाढेत हाड अडकले आहे. तुझ्या चोचीने ते काढ. बगळ्याचा नाईलाज होता. सेवा करणे भाग होते. सिंहाने जबडा वासला. बगळ्याने आपली मान त्या जबड्यात घालून ते हाड बाहेर काढले. सिंहाला एकदम बरे वाटले. हावरट बगळा म्हणाला, सिंहराज, माझ्या सेवेचे बक्षीस हवे.

मागच्या झुडपातून कोल्हा म्हणाला, मूर्खा! तू सिंहाच्या जबड्यातले हाड काढायला तुझी मान त्या जबड्यात घातलीस, तेव्हा सिंहाने तुला खाल्ले नाही हेच बक्षीस समज. लवकर पळ.–

बगळा समजला, पळून गेला.

– किशोर गांधी

# निमगाव वाघा येथे रामकथेचा भक्तिमय समारोप; जय श्रीरामच्या घोषणांनी परिसर दुमदुमला

नगर – नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथेचा नुकताच अत्यंत भक्तिमय आणि उत्साहात समारोप झाला. ९ दिवस गावात श्रीराम नामाचा गजर घुमत होता. श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या रामकथेला ग्रामस्थ आणि भाविकांनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

गावातील श्री नवनाथ मंदिर परिसरात हा धार्मिक सोहळा रंगला होता. ह.भ.प. रामायणाचार्य संतोष महाराज कौठाळे (देवदैठण) यांनी आपल्या ओजस्वी वाणीतून रामायणातील विविध प्रसंगांचे प्रभावी निरूपण करत भाविकांना मंत्रमुग्ध केले. प्रभू श्रीरामांचे आदर्श जीवन, सत्य, कर्तव्य, त्याग, भक्ती आणि धर्म यांचे महत्त्व त्यांनी आपल्या प्रवचनातून विशद केले. रामायण हे केवळ धार्मिक ग्रंथ नसून जीवनाला योग्य दिशा देणारे संस्कारमूल्यांचे दीपस्तंभ असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

रामकथेच्या प्रारंभी नाना डोंगरे यांनी संतोष महाराज कौठाळे यांचे स्वागत केले. यावेळी कथेचे आयोजक ह.भ.प. विठ्ठल महाराज फलके, नामदेव फलके, दत्तात्रय फलके, चंद्रकांत जाधव, पोपट भगत, अतुल फलके, छगन भगत, अशोक फलके, भाऊसाहेब ठाणगे, अरुण कापसे, किरण जाधव, सागर कापसे, बबन जाधव, जयराम जाधव यांच्यासह ग्रामस्थ आणि भाविक उपस्थित होते.

या रामकथेचे विशेष आकर्षण म्हणजे लहान मुलांनी साकारलेले रामायणातील विविध जिवंत प्रसंग होते. बालकलाकारांनी प्रभू श्रीराम, माता सीता, लक्ष्मण, हनुमान, रावण आदी पात्रांचे केलेले सादरीकरण पाहून उपस्थित भारावून गेले. विशेषतः रावण वधाचा प्रसंग आणि प्रभू श्रीरामांचे अयोध्येत आगमन यावेळी संपूर्ण मंदिर परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. जय श्रीरामच्या घोषणांनी संपूर्ण गाव परिसर दणाणून निघाला.

रामकथेच्या यशस्वी आयोजनासाठी श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ आणि युवकांनी परिश्रम घेतले.



निमगाव वाघा येथे आयोजित करण्यात आलेल्या श्रीराम कथेचा नुकताच अत्यंत भक्तिमय आणि उत्साहात समारोप झाला. ९ दिवस गावात श्रीराम नामाचा गजर घुमत होता. श्री नवनाथ वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या रामकथेला ग्रामस्थ आणि भाविकांनी उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

# न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेत यश

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे न्यू आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६ मध्ये विविध देशपातळीवर आणि राज्य पातळीवर घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांमधून घवघवीत यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव इंजि. मुकेश मुळे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी अभिनंदन केले.


स्पर्धा परीक्षेत यश मिळविलेल्या न्यू आर्ट्स महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थी.

रसायनशास्त्र विभागातील महेश ढेपे आणि वैभव मंचरे हे देशातील नामांकित शिक्षण संस्था असलेलेली इंडियन इन्सिटिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी (IIT) च्या वतीने घेण्यात येणारी खखढ–गअच परीक्षा उत्तिर्ण झाले असून त्यांनी देशपातळीवर अनुक्रमे ८८३ व १३८७ क्रमांक प्राप्त केला आहे. तर वैभव पवार याने NET-JRF ही परीक्षा शिष्युवृत्तीसह उत्तिर्ण झाला असून त्याने देशपातळीवर २४ वा क्रमाक मिळवत मध्य प्रदेश भोपाळ येथली Indian Institute of Science Education and Research (IISER) येथे पीएचडी करिता प्रवेश मिळविला आहे. विभागातील अनेक विद्यार्थी नेट आणि सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये शिवानंद चव्हाण आणि भावना राजपुरोहित हे दोघे NET-JRF परीक्षा देशपातळीवर अनुक्रमे ३८ व ५५ क्रमांक मिळवत उत्तीर्ण झाले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्यावतीने घेण्यात येणारी SET परीक्षेत शिवानंद चव्हाण, भावना राजपुरोहित, कु. मोनिका रणसिंग, कु. पुजा पालवे, कु. ज्ञानेश्वरी जवाणजळे, शिवम मरकड, गणेश पंधरकर, कु. प्रेरणा यादव, आनंद मुथा या विद्यार्थ्यांनी उत्तीर्ण होत मोठे यश संपादन केले.

रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थिनी कु. दिव्या भडके हिने महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) परीक्षा उत्तीर्ण होत उल्लेखनीय यश प्राप्त केले तर कु. प्रज्ञा जोशी हिने जिल्हा न्यायालयाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध पदांसाठी झालेल्या परीक्षेत यश मिळविले.

रसायनशास्त्र विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांकरिता NET, SET आणि IIT-JAM मार्गदर्शन कार्याशाळा दरवर्षी आयोजित करण्यात येतात. याचा फायदा अनेक विद्यार्थ्यांना झाला असून महाविद्यालयाचे व रसायनशास्त्र विभागाचे अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून उच्च पदांवर कार्यरत असल्याचे प्रतिपादन रसायनशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. सुषमा दरे यांनी केले.

# आनंदऋषिजी हॉस्पिटल येथे मूत्रपिंडाच्या मोठ्या गाठीवर दुर्बिणीद्वारे यशस्वी शस्त्रक्रिया




नगर – आनंदऋषिजी हॉस्पिटल येथील युरोलॉजी विभागामध्ये अत्यंत गुंतागुंतीच्या मूत्रपिंडाच्या मोठ्या गाठीवर यशस्वी लॅप्रोस्कोपिक रॅडिकल नेफ्रेक्टॉमी करण्यात आली. रुग्णाच्या मूत्रपिंडाच्या वरच्या भागात सुमारे 10 x 8 x 8 सें.मी. आकाराची मोठी गाठ होती. ही गाठ यकृत (लिव्हर), ओमेंटम आणि डायफ्रामला चिकटलेली असल्यामुळे शस्त्रक्रिया अत्यंत आव्हानात्मक मानली जात होती.

ही अवघड शस्त्रक्रिया डॉ. अमेय सांगळे आणि डॉ. अजित दरंदले यांनी अत्यंत कौशल्याने पार पाडली. भूलतज्ज्ञ म्हणून डॉ. रूप क्षीरसागर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. दुर्बिणीद्वारे (लॅप्रोस्कोपिक पद्धतीने) संपूर्ण मूत्रपिंड आणि गाठ सुरक्षितपणे काढण्यात आली.

मोठ्या चिराऐवजी लहान छिद्रांद्वारे करण्यात आलेल्या या शस्त्रक्रियेमुळे रुग्णाला कमी वेदना, कमी रक्तस्राव आणि जलद पुनर्वसनाचा फायदा झाला. विशेष म्हणजे, शस्त्रक्रियेनंतर कोणतीही गुंतागुंत न होता रुग्णाला अवघ्या तिसऱ्या दिवशी सुखरूप घरी सोडण्यात आले.

रुग्णालयातील युरोलॉजी विभाग अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असून येथे एंडोयुरोलॉजी व मिनिमली इन्वेसिव्ह शस्त्रक्रिया (दुर्बिणीद्वारे) नियमितपणे केल्या जातात. किडनी स्टोन, प्रोस्टेट, मूत्रमार्गातील अडथळे तसेच मूत्रपिंडाच्या कर्करोगावर दुर्बिणीद्वारे आधुनिक उपचार उपलब्ध असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

डॉक्टरांच्या मते, आधुनिक लॅप्रोस्कोपिक तंत्रज्ञानामुळे मोठ्या व गुंतागुंतीच्या मूत्रपिंडाच्या गाठींवरही सुरक्षित आणि परिणामकारक उपचार शक्य होत असून, वेळेवर निदान आणि तज्ज्ञ उपचार घेतल्यास रुग्ण लवकर बरे होऊ शकतात.


शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेर कॉलेजच्या निवडणुकीमध्ये विजय होऊन विश्वस्तपदी निवड झाल्याबद्दल नगरसेवक अरुण ताजणे यांचा सत्कार करताना डॉ. सुदर्शन गोरे, डॉ. केतन गोरे, माधवराव लोखंडे, संतोष अंत्रे पाटील व प्रविण घोगरे.

# नगरमध्ये १० जून रोजी ब्रायडल मेकअप स्पर्धा

नगर – प्रतिबिंब संस्थेच्या वतीने व अहिल्यानगर जिल्हा ब्युटीपार्लर असोसिएशनच्या सहकार्याने १० जून रोजी नगरमध्ये ब्रायडल मेकअप स्पर्धा (नववधू मेकअप स्पर्धा) ब्युटिशियन साठी घेण्यात येणार आहे, स्पर्धाचे हे ४ थे वर्षे आहे



स्टेशनरोड येथील यश ग्रँड हॉटेल येथे १० जून ला दुपारी १२ वा आयोजित करण्यात आली आहे. विजेत्या ब्युटिशियनला बेस्ट ब्युटिशन ऑफ ब्रायडल हा पुरस्कार देण्यात येणार आहे, यामध्ये एकूण ३ क्रमांक काढण्यात येणार आहेत

स्पर्धकांनी कोणत्याही प्रकारची, जातीची, धर्माची नववधु बनवता येईल त्यासाठी मेकअपला १ तासाचा वेळ देण्यात येईल, कोणीही या स्पर्धेत भाग घेऊ शकते, ब्युटिशियन आपल्याबरोबर एक असिस्टंट ठेवू शकते. सहभागी ब्युटिशियनला सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात येईल ज्यांना या स्पर्धेत भाग घ्यायचा आहे त्यांनी प्रतिबिंब संस्था, स्टेट बँके समोर, दिल्लीगेट, अहिल्यानगर मोबाईल ९२८४९३०६७४ किंवा अनुजा कांबळे ९८५०२६२५९५, सायली मेहता ८०८७२२६२४६ वर संपर्क साधावा असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# स्वप्नांच्या पंखांना बळ देण्याचे काम बँक करते

## नयनकुमार दुबे यांचे प्रतिपादन; सेंट्रल बँक ऑफ इंडियाकडून १६७ खातेधारकांना १५ कोटींचे कर्जवाटप

नगर – सर्वसामान्य नागरिकांच्या स्वप्नांना आर्थिक बळ देत त्यांची प्रगती साधण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया सातत्याने कार्यरत असून शिक्षण, गृह, वाहन तसेच उद्योजकतेच्या प्रत्येक टप्प्यावर बँक ग्राहकांच्या पाठीशी उभी असल्याचे प्रतिपादन सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नयनकुमार दुबे यांनी केले.


अहिल्यानगर येथे सेंट्रल बँक ऑफ इंडिया प्रादेशिक कार्यालया आयोजित ‘मेगा रिटेल क्रेडिट आउटरीच कॅम्प २०२६’चे क्रीडाईचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना सचिव दीपक बांगर. समवेत क्षेत्रीय प्रबंधक नयनकुमार दुबे, उद्योजक शिवदास डोके, एलडीएम आशिष नवले, मुख्य प्रबंधक संजय कराड, डी. पी. काळे, प्रमोद दहिफळे आदी. (छाया – समीर मन्यार)

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, प्रादेशिक कार्यालय अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘मेगा रिटेल क्रेडिट आउटरीच कॅम्प २०२६’ मध्ये ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन क्रीडाईचे सचिव दीपक बांगर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी उद्योजक शिवदास डोके, एलडीएम आशिष नवले, मुख्य प्रबंधक संजय कराड डी. पी. काळे, प्रमोद दहिफळे बि डी शिरसाठ यांच्यासह ग्राहक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नयनकुमार दुबे म्हणाले, मध्यमवर्गीय कुटुंबासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही केवळ बँक नसून त्यांच्या कुटुंबाचा एक भाग आहे. प्रत्येक जण आयुष्यात मोठी स्वप्ने पाहतो, मात्र ती पूर्ण करण्यासाठी विश्वासार्ह साथीदाराची गरज असते. बँक त्या स्वप्नांना आर्थिक पाठबळ देण्याचे काम करत आहे.

दीपक बांगर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, सेंट्रल बँक ऑफ इंडिया नेहमीच सर्वसामान्यांच्या पाठीशी उभी राहिली आहे. गृहकर्ज, वाहन कर्ज, शैक्षणिक कर्ज अशा विविध योजनांद्वारे ग्राहकांना नवी उभारी मिळत आहे. या कॅम्पमध्ये १६७ खातेधारकांना १५ कोटी रुपयांच्या कर्जाचे वितरण करण्यात आले असून त्यामुळे अनेकांची स्वप्ने साकार होण्यास मदत होणार आहे. ग्राहकांनी घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करून आपली पत अधिक मजबूत करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

एलडीएम आशिष नवले यांनी सांगितले की, सर्वसामान्य जनतेपर्यंत बँकेच्या योजना, सेवा व आर्थिक सक्षमीकरणाच्या संधी पोहोचाव्यात या सामाजिक भावनेतून अशा कॅम्पचे आयोजन करण्यात येते. ग्राहकांची आर्थिक उन्नती साधण्यास या उपक्रमांचा मोठा फायदा होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमा दरम्यान सागर तनपुरे यांनी पीपीटीच्या माध्यमातून बँकेच्या विविध कर्ज योजनांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. सूत्रसंचालन प्रमोद दहिफळे यांनी केले. आशिष नवले यांनी आभार मानले.

### सेंट्रल बँकेमुळे आमची स्वप्ने पूर्ण झाली

शैक्षणिक, वाहन व गृहकर्ज लाभार्थ्यांनी यावेळी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, सेंट्रल बँक ऑफ इंडियाने त्यांच्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी महत्त्वाची साथ दिली. विदेशात शिक्षण घेण्याचे स्वप्न, नवीन वाहन खरेदी करण्याची इच्छा तसेच स्वतःचे घर घेण्याची आकांक्षा बँकेच्या कमी व्याजदरातील आणि जलद प्रक्रियेतील कर्जामुळे पूर्ण होत असल्याच्या भावना ग्राहकांनी व्यक्त केल्या.

# कवी सखाराम गोरे यांच्या कवितेतून ग्रामीण संस्कृतीचे जिवंत दर्शन

## माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांचे प्रतिपादन, 'शब्द फुलांची ओंजळ' काव्यसंग्रहाचे प्रकाशन



कवी सखाराम गोरे लिखित व गणराज प्रकाशन प्रकाशित 'शब्द फुलांची ओंजळ' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रसंगी माजी प्राचार्य खासेराव शितोळे आदी.

नगर – संवेदना हृदयात उतरून जेव्हा शब्दरूपी उमटतात, तेव्हा साहित्य आणि काव्यनिर्मिती घडते. काव्य हे साहित्याचे दागिने असून, कमी शब्दांत मोठा आशय व्यक्त करण्याची ताकद कवितेमध्ये असते. विचारांवर विचार करायला लावणारा कवी समाजासाठी महत्त्वाचा असतो. अनुभव जेव्हा अनुभूतीपर्यंत पोहोचतो, तेव्हाच खरी कलाकृती साकारते. ग्रामीण भागातील जीवनाची वास्तवता, अनुभवता आणि कल्पकता कवी सखाराम गोरे यांच्या कवितांमधून प्रभावीपणे उमटते, असे प्रतिपादन माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी केले.

ग्रामीण संस्कृती, माणसांमधील जिव्हाळ्याची नाती, आईचे ममत्व, भक्तीभाव आणि ग्रामीण जीवनातील सहज–सोप्या भावविश्वाचा हृदयस्पर्शी आविष्कार घडविणाऱ्या कवी सखाराम गोरे लिखित व गणराज प्रकाशन प्रकाशित 'शब्द फुलांची ओंजळ' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी अध्यक्षीय भाषणात शितोळे बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर, कविवर्य चंद्रकांत पालवे, प्रा. भगवान काटे, प्रकाशक तथा मसाप जिल्हाप्रमुख प्रा. गणेश भगत, कवी सखाराम गोरे, संतोषकुमार गोरे, शिवप्रसाद गोरे, अजय ढमाले, बाळासाहेब चौधरी, सुभाष बर्वे आदी उपस्थित होते. तसेच महानगर ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. गणेश भगत यांनी गणराज प्रकाशनाच्या कार्याचा आढावा घेताना सांगितले की, ग्रामीण भागातील होतकरू कवी आणि साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य गणराज प्रकाशन सातत्याने करत आहे. ग्रामीण विचार, संस्कृती आणि माणुसकी समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी साहित्य प्रकाशनाची महत्त्वपूर्ण भूमिका संस्था पार पाडत आहे. 'शब्द फुलांची ओंजळ' हे गणराज प्रकाशनाचे तब्बल २०७ वे पुस्तक असल्याचे त्यांनी अभिमानाने नमूद केले.

जयंत येलुलकर यांनी कवी सखाराम गोरे हे व्यासंगी साहित्यिक असून हा त्यांचा सातवा काव्यसंग्रह असल्याचे सांगितले. त्यांच्या कवितांमध्ये जीवनातील सहजभाव, निसर्ग, माणुसकी आणि ग्रामीण जगण्याचे वास्तव प्रभावीपणे उमटले आहे. ग्रामीण मातीतली नाळ त्यांच्या कवितांमधून स्पष्ट जाणवते. त्यांच्या शब्दरचनेत रांगड्या बोलीभाषेची गोडी असून ती वाचकांच्या मनाला थेट स्पर्श करते, असे त्यांनी नमूद केले.

कविवर्य चंद्रकांत पालवे यांनी कवी गोरे यांच्या संघर्षमय आणि दारिद्र्यपूर्ण जीवनप्रवासाचा उल्लेख करताना सांगितले की, त्यांनी आपल्या कवितांमधून वास्तव जीवनाचे प्रभावी प्रतिबिंब उमटविले आहे. त्यांच्या ग्रामीण कविता खऱ्या अर्थाने समाजमनाला भिडणाऱ्या असून युवकांना प्रेरणा देणाऱ्या असल्याचे स्पष्ट केले.

प्रा. भगवान काटे यांनी ग्रामीण भागातील जीवनमूल्ये, संस्कार आणि संवेदना जपणारे साहित्य समाजासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले. सखाराम गोरे यांच्या कवितांमध्ये ग्रामीण जीवनातील वास्तव, नात्यांतील ऊब आणि माणुसकीचा स्पर्श स्पष्ट जाणवतो. विशेषतः ग्रामीण स्त्रीजीवनाचे प्रभावी चित्रण त्यांच्या कवितेत आढळते. कष्टमय आयुष्य जगणारी, घरातील जबाबदाऱ्या सांभाळणारी, भक्तिभावाने तुळशीला पाणी घालणारी संस्कारशील स्त्री आणि कुटुंबाचा केंद्रबिंदू असलेली चैतन्यमय कारभारीण अशा विविध रूपांचे जिवंत चित्रण त्यांच्या कवितांमधून दिसून येते. आईच्या ममत्वाचा आणि त्यागाचा भावनिक आविष्कारही त्यांच्या कवितांमध्ये प्रकर्षाने जाणवतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी कवी सखाराम गोरे यांनी आपल्या साहित्य प्रवासाविषयी मनोगत व्यक्त केले. बालपणापासूनच लेखणीचा छंद जडला. अवांतर वाचनातून शाहीर अण्णाभाऊ साठे आणि अमर शेख यांच्या विचारांचा प्रभाव पडला. त्यांच्या प्रेरणेने शाहिरी पोवाडे रचण्यास सुरुवात केली. पुढे कवितेचा कंठ फुटला आणि कविता नसानसांत भिनली. कविता ही आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय समारोपात खासेराव शितोळे यांनी पुन्हा एकदा कवी गोरे यांच्या कवितेतील संवेदनशीलता, जीवनानुभव आणि अंतर्मनाला स्पर्श करणाऱ्या भाषाशैलीचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुभाष बर्वे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ढमाले परिवार आणि आठरे परिवारातील सदस्यांनी परिश्रम घेतले.

# ज्ञानभारतम प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी समन्वयाने कार्य करा : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर – भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि बौद्धिक परंपरेचा अमूल्य ठेवा असलेल्या हस्तलिखितांचे जतन, संवर्धन आणि डिजिटायझेशन करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या 'ज्ञानभारतम' प्रकल्पाची जिल्हास्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात ज्ञानभारतम या प्रकल्पांतर्गत कार्यवाहीच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते. यावेळी तहसीलदार नागेश गायकवाड, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, महानगरपालिकेचे उपायुक्त मेहेर लहारे, संग्रहालयाचे डॉ. संतोष यादव, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) राजश्री घोडके यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, भारत सरकारमार्फत राबविण्यात येणारा ज्ञानभारतम प्रकल्प हा देशाच्या सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. जिल्ह्यातील प्राचीन हस्तलिखितांचा शोध घेऊन त्यांचे दस्तऐवजीकरण, संवर्धन आणि डिजिटायझेशन करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी सक्रिय सहभाग नोंदवावा. अनेक मौल्यवान हस्तलिखिते वैयक्तिक संग्राहकांकडे, मंदिरांमध्ये, मठांमध्ये आणि ग्रंथालयांमध्ये उपलब्ध आहेत.

या हस्तलिखितांची योग्य नोंदणी करून त्यांचे संरक्षण करणे आवश्यक आहे. ज्ञानभारतम मोबाईल ॲपच्या माध्यमातून माहिती संकलनाची प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या.

ज्ञानभारतम प्रकल्पामुळे भारताचा ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. जिल्ह्यातील प्रत्येक महत्त्वपूर्ण हस्तलिखिताचा या मोहिमेत समावेश व्हावा यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.

# 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' प्राप्त संगीता मालकर यांचा गौरव

## आ. संग्राम जगताप यांच्या वतीने प्रा. माणिक विधाते यांनी केला सत्कार; सामाजिक व शैक्षणिक कार्याचा सन्मान



'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल संगीता मालकर यांचा प्रा. माणिक विधाते यांनी सत्कार केला.

नगर – महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागातर्फे सन २०२४–२५ या वर्षासाठी प्रदान करण्यात आलेला जिल्हास्तरीय 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संगीता मालकर यांचा आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने शहर बँकेचे व्हाइस चेअरमन तथा श्री विशाल गणपती मंदिराचे विश्वस्त प्रा. माणिक विधाते यांनी सत्कार केला. या सत्कार समारंभाप्रसंगी आंतरराष्ट्रीय खेळाडू आप्पासाहेब ढूस, शिवाजी घाडगे, कारभारी गरड, चंद्रकांत सोनार यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक व बँकिंग क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संगीता मालकर यांना श्री विशाल गणेशाची प्रतिमा, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रा. माणिक विधाते म्हणाले की, संगीता मालकर या महिला सक्षमीकरणासाठी निस्वार्थ भावनेने काम करत आहे. केवळ शिक्षिका म्हणून नव्हे, तर समाजातील वंचित, गरजू आणि एकल महिलांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करणाऱ्या कार्यकर्त्या म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुरस्कार' हा केवळ पुरस्कार नसून समाजसेवा, स्त्री सक्षमीकरण आणि लोकहितासाठी झटणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा सन्मान आहे. हा पुरस्कार संगीता मालकर यांना मिळणे म्हणजे त्यांच्या अनेक वर्षांच्या समर्पित कार्याची पावती आहे. त्यांनी शिक्षक गुणगौरव पुरस्कारातून मिळालेली मोठी रक्कम गरजू महिलांसाठी शिवणयंत्रे खरेदी करून खर्च केली. ही बाब त्यांच्या संवेदनशीलतेचे आणि समाजाप्रती असलेल्या बांधिलकीचे प्रतीक आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक महिलांना नवे आयुष्य मिळाले असून अनेक विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

संगीता मालकर या कोपरगाव येथील श्रीमान गोकुळचंदजी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत असून गेल्या ३६ वर्षांपासून त्या शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. शिक्षणाबरोबरच त्यांनी सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य उभे केले आहे. त्या सावित्रीबाई फुले ज्ञानदीप प्रतिष्ठानच्या अध्यक्षा असून 'साऊ एकल महिला समिती महाराष्ट्र राज्य'च्या तालुका समन्वयक म्हणूनही कार्यरत आहेत.

तालुक्यातील एकल महिलांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी त्यांनी अनेक उपक्रम प्रभावीपणे राबविले आहेत. महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी शिलाई मशीनचे वाटप, शेळीपालनासाठी शेळ्यांचे वितरण, आरोग्य शिबिरे, सॅनिटरी नॅपकिन वितरण तसेच गरजू कुटुंबांना कडधान्यांचे वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला आहे. तसेच एकल महिलांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य, उच्च शिक्षणासाठी लॅपटॉप उपलब्ध करून देत त्यांनी अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणला आहे.

बालकांच्या सक्षमीकरणासाठीही त्यांनी सातत्याने कार्य केले असून शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक जाणीवा निर्माण करण्यासाठी विविध मोहिमा राबवल्या आहेत. विशेष म्हणजे, त्यांना प्राप्त झालेल्या शिक्षक गुणगौरव पुरस्कारातून मिळालेली एक लाख दहा हजार रुपयांची रक्कम स्वतःसाठी खर्च न करता त्यांनी गरजू महिलांना शिवणयंत्रे देण्यासाठी वापरली. त्यांच्या या सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य महिला आयोगानेही नुकताच त्यांचा विशेष गौरव केला आहे. त्यांना तब्बल तीन महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार मिळाले आहेत.

# २९ मे १९५३ : माउंट एव्हरेस्ट पादाक्रांत झाले आणि बदलून गेले गिर्यारोहणाचे विश्व

२९ मे १९५३ रोजी न्यूझीलंडचे एडमंड हिलेरी आणि शेर्पा तेनझिंग नोर्गे यांनी जगातील सर्वोच्च शिखर 'माऊंट एव्हरेस्ट'वर (८,८४८.८६ मीटर) पाऊल ठेवले आणि मानवी इतिहासात एक नवा अध्याय लिहिला गेला. या ऐतिहासिक घटनेला आता सात दशकांपेक्षा जास्त काळ उलटून गेला आहे. आज ७३ वर्षांत केवळ तंत्रज्ञानच बदलले नाही, तर गिर्यारोहण (Mountaineering) या क्षेत्राचा संपूर्ण चेहरामोहरा बदलला आहे. १९५३ च्या त्या ऐतिहासिक मोहिमेनंतर गिर्यारोहण क्षेत्रात नेमके काय आणि कसे बदल आमुलाग्र घडले, याचा वेध घेण्याचा हा छोटासा प्रयत्न.

### तंत्रज्ञान आणि साहित्यातील क्रांती

हिमालयामध्ये गिर्यारोहण करताना अनेक पद्धतीचे साहित्य व कपडे वापरले जातात. १९५३ मध्ये हिलेरी आणि तेनझिंग यांनी वापरलेले साहित्य आजच्या तुलनेत अत्यंत वजनदार आणि प्राथमिक स्वरूपाचे होते. त्यांचे कपडे जड लोकरीचे आणि कॅनव्हासचे होते, तर ऑक्सिजन सिलिंडरचे वजन खूप जास्त होते. आजचे अनेक गिर्यारोहक 'गोरे–टेक्स' सारख्या वॉटरप्रूफ आणि विंडप्रूफ कापडाचे वजनाने हलके कपडे वापरतात.

### लाइटवेट गियर्स

आजचे बूट – क्रॅम्पन्स (बर्फावर चालण्याचे खिळे) आणि ऑक्सिजन सिलिंडर कमालीचे हलके आणि अतिशय सुरक्षित झाले आहेत. यामुळे गिर्यारोहकांचा शारीरिक ताण प्रचंड प्रमाणात कमी झाला आहे.

### हवामान अंदाज आणि दळणवळण

१९५३ मध्ये मोहिमेवर गेलेल्या लोकांना हवामानाचा अचूक अंदाज बांधणे अशक्य होते. कित्येक दिवस त्यांना बेस कॅपशी संपर्क साधता येत नसे. आज बेस कॅम्प पासून माउंट एव्हरेस्टच्या सागर माथ्यापर्यंत हाय स्पीड इंटरनेट सुविधा उपलब्ध आहे त्यामुळे संवाद साधने खूपच सोपे झाले आहे. तसेच हवामानामध्ये होणारे बदल व लहरी वातावरण याचे अंदाज बांधणे देखील आधुनिक तंत्रज्ञाने काहीशे सोपे झाले आहे. त्यामुळे चढाई करताना गिर्यारोकांना हवामानाचे अंदाज घेऊन चढाई करणे सोपे जाते.

### सॅटेलाईट आणि अचूक अंदाज

आज सॅटेलाईट फोन्स, जीपीएस (GPS) ट्रॅकर्स आणि अचूक हवामान अंदाजांमुळे गिर्यारोहकांना 'विंडो' (हवामान स्वच्छ असणारा काळ) कधी मिळणार, याची अचूक माहिती मिळते. यामुळे अचानक येणाऱ्या वादळांमध्ये अडकून होणारे मृत्यू मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहेत.

### गिर्यारोहण क्षेत्रातील 'व्यापारीकरण'

१९५३ ची मोहीम ही एका देशाची प्रतिष्ठा आणि अत्यंत मर्यादित साधनांनी केलेली मोहीम होती. आज एव्हरेस्ट सर करणे हा एक मोठा व्यवसाय बनला आहे. आज जगाभरातील अनेक गिर्यारोहक नेपाळ मधील साउथ कोल या भागातून मोठ्या संख्येने मोठी रक्कम एवरेस्ट मोहिमा आखणाऱ्या कंपन्यांना देऊन जगातील सर्वोच्च शिखरावर जाण्याचा मानस पूर्ण करत आहेत. नेपाळमधील अर्थव्यवस्थेला या मोहिमांचा खूप मोठ्या प्रमाणात फायदा होतो, पण दुसरीकडे मोठ्या संख्येने जगातील सर्वोच्च शिखर सर करायला आलेल्या गिर्यारोहकां मुळे सर्वोच्च शिखरावर ट्रॅफिक जॅम सारखी परिस्थिती अनेक वेळा उद्भवते आहे.

कमर्शियल गाईड्स: अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या लाखो रुपये घेऊन हौशी गिर्यारोहकांना एव्हरेस्टवर घेऊन जातात. यामुळे निश्चितच लोकांना रोजगार मिळाले आहे, पण एवरेस्ट सारख्या बलाढ्य शिखरावर मानवा द्वारे फेकला जाणारा कचरा देखील मोठ्या प्रमाणात साचत आहे. त्यामुळे पर्वतावरील वातावरणाला धोका निर्माण होत आहे.

'ट्रॅफिक जॅम'चे संकट: वाढत्या गर्दीमुळे आज एव्हरेस्टच्या 'डेथ झोन' मध्ये अर्थात (८,००० मीटरच्या वर) गिर्यारोहकांचे ट्रॅफिक जॅम पाहायला मिळते, जे सध्याच्या काळातील एक मोठे आव्हान बनले आहे. २० मे २०२६ रोजी जगातील सर्वोच्च शिखरावर २७४ गिर्यारोहकांनी आपले एव्हरेस्ट सर करण्याचे स्वप्न एकाच दिवशी पूर्ण केल्याचे वृत्त सगळ्या जगाभरात क्षणार्धात पसरले. २०१९ मध्ये हा रेकॉर्ड २१३ गिर्यारोहक एका दिवशी सागर माथ्यावर असल्याचा होता. एकाच वेळी डेथ झोन मध्ये इतके गिर्यारोहक सागरमाथा गाठण्यासाठी धडपड करत असताना मोठी दुर्घटना होण्याची भीती देखील निर्माण होते. यंदा २ भारतीय गिर्यारोहक तसेच ३ शेर्पा यांचा देखील एवरेस्ट चढताना अथवा खाली उतरताना विविध कारणाने मृत्यू झाल्याच्या बातम्या वृत्तातून झळकल्या. गिर्यारोहण क्षेत्रातील अनेक व्यक्तींना अशा बातम्या हळहळ करण्यासाठी भाग पाडतात.

शेर्पा समाजाचा बदललेला सामाजिक आणि आर्थिक दर्जा: १९५३ मध्ये शेर्पा तेनझिंग नोर्गे यांना 'मार्गदर्शक' किंवा 'हमाल' म्हणून पाहिले गेले होते (जरी त्यांचे योगदान हिलेरींइतकेच मोठे होते). पण आज शेर्पा हे केवळ मार्गदर्शक राहिले नसून ते जागतिक दर्जाचे हाय–अल्टिट्यूड गाईड्स आणि रेस्क्यू एक्सपर्ट्स झाले आहेत.


कामी रिटा शेर्पा यांनी आज पर्यंत ३२ वेळा एव्हरेस्ट सर केले आहे. यांच्यासारख्या शेर्पांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आज नेपाळच्या अर्थव्यवस्थेत आणि गिर्यारोहण उद्योगात शेर्पा समाज केंद्रस्थानी आहे. निर्मल पुजारा यांनी देखील ८००० मीटर वरील शिखरे आजपर्यंत ५४ वेळा पदक्रांत केली आहे. काही गिर्यारोकांनी जगातील १४ सर्वोच्च शिखरे काबीज करण्याचे दिव्य आव्हान पेलून नेले आहे.

पर्यावरण आणि स्वच्छतेचे आव्हान: १९५३ मध्ये एव्हरेस्ट शिखराचा सागर माथा पहिल्यांदा सर करण्यात आला तोपर्यंत सागर माथ्यावर कोणीही गिर्यारोहक पोहोचू शकले नाही. आज दरवर्षी शेकडो लोक तिथे जात असल्यामुळे एव्हरेस्टला जगातील सर्वात उंच कचराकुंडी असेही म्हटले जाऊ लागले आहे. मागे सोडलेले ऑक्सिजन सिलिंडर्स, प्लास्टिक आणि मानवी विष्ठा यांमुळे तिथले पर्यावरण धोक्यात आले आहे. अर्थात, आता 'सस्टेनेबल माउंटेनियरिंग'वर (शाश्वत गिर्यारोहण) भर दिला जात असून, कचरा खाली आणणे नेपाळ सरकारने बंधनकारक केले आहे.

### धाडसाकडून पर्यटनाकडे!

२९ मे १९५३ चा तो दिवस एका महाकाय आव्हानाला नमवण्याचा आणि मानवी जिद्दीचा होता. आज ७३ वर्षांनंतर, तंत्रज्ञानामुळे एव्हरेस्ट सर करणे पूर्वीपेक्षा 'सोपे' झाले असले, तरी निसर्गाचे आव्हान आजही तितकेच मोठे आहे. आज गिर्यारोहण हे केवळ 'अशक्य ते शक्य करणे' एवढ्यापुरते मर्यादित न राहता, ते साहसी पर्यटन, क्रीडा प्रकार आणि एक आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित झाले आहे. हिलेरी आणि तेनझिंग यांनी लावलेली ही ज्योत आजही जगभरातील गिर्यारोहकांना प्रेरणा देत आहे. दार्जिलिंग, हिमाचल प्रदेश, उत्तरकाशी, काश्मीर, अरुणाचल प्रदेश अशा ठिकाणी गिर्यारोकांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्था उदयास आल्या त्यादेखील १९५३ च्या माउंट एवरेस्टच्या शिखराच्या चढाईनंतरच. या संस्था आज देखील अनेक शिखरावर पोचू इच्छिणाऱ्या गिर्यारोहकांना सातत्यपूर्ण पद्धतीने प्रशिक्षण देत आहेत एव्हाना ना देत राहतील!!

२०२६ मध्ये माउंट एवरेस्ट वरून आलेली सगळ्यात महत्त्वाची बातमी म्हणजे पुणे येथील गिरीप्रेमी या संस्थेतील जिगरबाज गिर्यारोहकांनी सागरमाथा मोहीम फत्ते केल्याची. ज्येष्ठ गिर्यारोहक श्री. उमेशजी झिरपे यांच्या नेतृत्वाखाली पुण्यातील विवेक शिवदे, अखिल काटकर व मिहीर जाधव या गिर्यारोहकांनी २१ मे रोजी भारतीय ध्वज तिरंगा व भगवा जगातील सर्वोच्च शिखरावर फडकवल्याची. संघातील निकुंज शहा यांचे मात्र यंदा सर्वोच्च शिखर सर करण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकले नाही!



ध्येय निश्चित असेल, तयारी चोख असेल आणि सोबतीला संयम असेल, तर यशाचे प्रत्येक शिखर तुमचेच आहे.

**– भरत झंवर (गिर्यारोहक),**
नव हिम सह्याद्री ट्रेकर्स, अहिल्यानगर ९५९५२२२६३०



रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोस यांचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार घेण्यात आला.

# रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलवर निवड

## बाबासाहेब भोस यांचा घोगरगावात नागरी सत्कार

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल माजी जिल्हा परिषद अध्यक्ष बाबासाहेब भोस यांचा पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार घेण्यात आला. यामध्ये घोगरगाव हरिपाठ मंडळ आणि श्रीराम भजनी मंडळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष देवेंद्र शेटे, विद्यमान सरपंच सुजाता भोसले, सोसायटीचे चेअरमन प्रकाश बोरुडे, उपसरपंच डॉ. दिलीप भोस, जालिंदर उल्हारे, गवाजी राऊत, विश्वास बोरुडे, महेश बोरुडे, उत्तम धामणे, बाळासाहेब शेटे, अर्जुन देवा शेळके, भुजबळ सर, सुधीर तरटे, राजेंद्र तरटे, प्रशांत भोस आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना जालिंदर उल्हारे म्हणाले की, जात, धर्म किंवा पक्ष न पाहता गोरगरिबांसाठी लढणारे आणि सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्य करणारे बाबासाहेब भोस हे लोकनेते आहेत. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत रयत शिक्षण संस्थेसारख्या नामांकित संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलवर त्यांची निवड होणे ही घोगरगावासाठी अभिमानाची बाब आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेब भोस यांना पुढील सामाजिक व शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सत्कारानंतर उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत भविष्यातही समाजहिताचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवावे व शिक्षण, समाजकारण आणि युवकांसाठी प्रेरणादायी नेतृत्व.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाच्या संधी वाढवण्याची अपेक्षा व्यक्त करत रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून समाजोपयोगी कामांना गती मिळेल. तसेच घोगरगावच्या सामाजिक आणि शैक्षणिक विकासात भोस यांचे योगदान महत्त्वाचे असणार असल्याची भावना व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीर शेख यांनी केले. प्रशांत भोस यांनी आभार मानले.



भाजप अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा सरचिटणीस सुनिल सकट यांना मानद डॉक्टरेट पदवी मिळाल्याबद्दल पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. दिल्ली येथील 'मॅजिक बुक ऑफ रेकॉर्ड फाऊंडेशन'च्या वतीने नुकतीच त्यांना सामाजिक व पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. शिर्डी येथे आयोजित भाजपच्या प्रशिक्षण वर्गात हा सत्कार सोहळा पार पडला. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीपराव भालसिंग, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष संजय गायकवाड, मुकुल गंधे, ॲड. देवेंद्र बंब, सावेडी मंडलाध्यक्ष ॲड. कुणाल वाणे, अंशुमन वाणे आदी उपस्थित होते.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## सूर्यप्रकाशाने अलाबामा नदीला दिले चमकदार 'ड्रॅगन'चे रूप

एका अंतराळवीराने टिपलेल्या अनोख्या छायाचित्रात, अमेरिकेतील अलाबामा राज्याच्या नावावरून पडलेल्या अलाबामा नदीचे एका सोनेरी, चिनी ड्रॅगनच्या रूपात दिसणारे खास दृश्य कॅमेऱ्यात कैद झाले आहे. या वळणावळणाच्या जलमार्गाला आलेली ही धातूसारखी चमक एका दुर्मीळ ऑप्टिकल घटनेमुळे आहे, जी फक्त अंतराळातूनच पाहता येते.

अलाबामा नदी हा ३१८ मैल (५१२ किलोमीटर) लांब जलमार्ग आहे. तो राज्याची राजधानी मॉन्टगोमेरीपासून सुरू होतो, बर्मिंगहॅम आणि सेल्मासारख्या शहरांमधून वाहत जाऊन, मोबाईल खाडीत मिळतो आणि तेथून मेक्सिकोच्या आखातात विलीन होतो. सूर्यप्रकाशामुळे होणाऱ्या सनग्लिंट घटनेमुळे ही नदी अंतराळातून चमकदार ड्रॅगनसारखी दिसून आली. नदीच्या मोठ्या वळणांसह एकत्र पाहिल्यास, जलमार्ग चिनी पौराणिक कथांमधील ड्रॅगनसारखा दिसत असल्याचे नेटिझन्सनी त्यावेळी सांगितले होते.

**ड्रॅगनचे डोके (प्रतिमेच्या डाव्या बाजूला)** : हे कृत्रिम विलियम 'बिल' डॅनेली जलाशयाच्या पूरग्रस्त भागातून तयार झाले



आहे. १९६० च्या दशकात नदीवर अर्धवट धरण बांधून हा जलाशय तयार करण्यात आला होता. २७ चौरस मैल (७० चौरस किलोमीटर) आकाराचा हा जलाशय धरणाद्वारे जलविद्युत निर्माण करतो आणि क्रॅपी, बास आणि कॅटफिश मासेमारीसाठी एक लोकप्रिय ठिकाण बनला आहे. 'नासा'च्या अर्थ ऑब्झर्व्हेटरीनुसार, धरण बांधल्यानंतर नदीची पाण्याची पातळी अपेक्षेपेक्षा जास्त वाढली, ज्यामुळे पाणी आजूबाजूच्या पूरमैदानांमध्ये कायमस्वरूपी पसरले. चिलाटची खाडीजवळ (जी ड्रॅगनच्या शेपटीच्या वळणाकडे आहे) आणि गीज बेंडच्या आसपास हे पूरग्रस्त भाग तयार झाले.

**'सनग्लिंट' म्हणजे काय?**

फोटोमध्ये नदीचा जो भाग दिसत आहे, त्यात गीज बेंड नावाचे मोठे इंग्रजी 'यू' आकाराचे वळण आहे. या वळणाभोवती बोयकिन नावाचे छोटे शहर वसलेले आहे, जे आकर्षक लोककलांसाठी प्रसिद्ध आहे. नदीला आलेली ही असामान्य चमक एका दुर्मीळ घटनेमुळे आहे, ज्याला सनग्लिंट म्हणतात. जेव्हा सूर्याचा प्रकाश स्थिर पाण्याच्या पृष्ठभागावरून अंतराळातील निरीक्षकाकडे (उदा. अंतराळवीर) परिपूर्णपणे परावर्तित होतो, तेव्हा ही घटना घडते. हे एखाद्या महाकाय द्रव आरशासारखे कार्य करते. सूर्यास्ताच्या वेळी समुद्र किंवा तलावाच्या पृष्ठभागावर जसे पाणी चमकते, तशीच ही घटना आहे, फरक एवढाच की ती फक्त अंतराळवीरच पाहू शकतात. या सोनेरी 'सनग्लिंट'मुळे पाणी आणि जमीन यांच्यात चांगला फरक दिसून येतो, ज्यामुळे अनेक पूरग्रस्त भाग हायलाईट होतात.

## व्यायामापूर्वी की नंतर? केळी खाण्याची सर्वोत्तम वेळ कोणती?

अनेक लोक तंदुरुस्ती राखण्यासाठी व्यायाम करतात. मग तो जिममध्ये जाऊन असो, रनिंग, योगासने किंवा इतर कोणताही शारीरिक व्यायाम असो. सोबतच पूरक आहारदेखील तेवढाच महत्त्वाचा असतो. तसेच फळे खाणेदेखील तेवढेच महत्त्वाचे असते. त्यातीलच एक म्हणजे केळी. केळी हे सर्वात जास्त सेवन केले जाणारे फळ आहे. कारण, ते त्वरित ऊर्जा देतात, पोटाला जड वाटत नाहीत आणि शरीराला आवश्यक पोषक तत्त्वे प्रदान करतात. केळीमध्ये कार्बोहायड्रेटस्, पोटॅशियम आणि नैसर्गिक साखरेसह ऊर्जा वाढवणारे घटक असतात; पण अनेकदा हा गोंधळ होतो की, केळी या व्यायामापूर्वी खायला हव्यात की व्यायामानंतर? जाणून घेऊयात.

जेव्हा कोणी नियमितपणे व्यायाम करतो तेव्हा त्याने केळी खावी जेणेकरून त्याची ताकद वाढेल आणि भरपूर ऊर्जा टिकून राहील. व्यायाम सुरू करण्यापूर्वी तीस ते ५० मिनिटे आधी केळी खाणे सर्वोत्तम मानले जाते. यामुळे तुमच्या व्यायामाची तीव्रता आणि क्षमता वाढते, ज्यामुळे तुम्ही पूर्ण जोमाने व्यायाम करू शकता. केळीमध्ये असलेले ग्लुकोज, फ्रुक्टोज, पोटॅशियम आणि फायबरसारखे पोषक घटक शारीरिक तंदुरुस्तीसाठी आवश्यक आहेत. ते स्नायूंच्या क्रॅम्पपासून आराम देतात आणि स्टॅमिना वाढवतात.


जर तुम्ही जास्त व्यायाम केला असेल किंवा कसरत केली असेल, तर स्नायूंच्या आरोग्यासाठीही केळी हे सर्वात प्रभावी अन्न आहे. केळीमध्ये भरपूर फायबर असते, जे कसरत केल्यानंतर त्वरित ऊर्जा प्रदान करते. ते शरीराला आवश्यक कार्बोहायड्रेटस् प्रदान करून स्नायूंच्या बळकटीसदेखील मदत करतात. जर तुम्हाला कसरत केल्यानंतर हाडांमध्ये वेदना होत असतील, तर केळीमधील मॅग्नेशियम आणि पोटॅशियम



त्या वेदना कमी करण्यास मदत करू शकतात. शिवाय, जर तुम्हाला कसरत करताना सूज येत असेल, तर केळीदेखील ती लवकर कमी करू शकतात. केळीमध्ये कार्बोहायड्रेटस् भरपूर असतात. केळी खाल्ल्याने आणि व्यायामानंतर ते खाल्ल्याने शरीराला प्रथिने चांगल्या प्रकारे शोषण्यास मदत होते. प्रथिने स्नायूंच्या वाढीला गती देतात, ज्यामुळे शरीर मजबूत होण्यास मदत मिळते.

## हिमयुगात होती हाडांची घरकुले!

हिमयुगाच्या अत्यंत कठीण आणि आव्हानात्मक काळात मानवाने तग धरण्यासाठी अविश्वसनीय कल्पकता वापरली होती, हे एका नवीन संशोधनातून समोर आले आहे. युक्रेन, रशिया आणि पोलंडसारख्या प्रदेशांत सापडलेल्या पुराव्यांनुसार, हिमयुगातील मानवाने अवाढव्य मॅमथच्या (हत्तींचा पूर्वज)



हाडांपासून गोलाकार घरे बांधली होती. ही घरे केवळ निवारा नव्हती, तर ती मानवी स्थापत्यकलेचे एक प्राचीन उदाहरण होती.


ओपन रिसर्च युरोप जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, पुरातत्त्वशास्त्रज्ञांना बर्फाखाली गाडलेल्या स्थितीत मॅमथच्या हाडांपासून बनवलेल्या गोलाकार संरचना सापडल्या आहेत. या संरचनांनी हिमयुगातील मानवी जीवनाबद्दल महत्त्वाची माहिती दिली आहे. ही घरे हिवाळ्यातील कडाक्याच्या थंडीपासून आणि हिंस्र प्राण्यांपासून संरक्षण मिळवण्यासाठी वापरली जात असत. मॅमथची मोठी आणि टिकाऊ हाडे धोरणात्मक पद्धतीने रचली गेली होती. ही घरे तात्पुरती नसून वर्षभर वापरली जात असावीत, असा संशोधकांचा अंदाज आहे. या संरचना केवळ निवाऱ्यायापुरत्या मर्यादित नव्हत्या.

काही पुरातत्त्वशास्त्रज्ञांच्या मते, ही ठिकाणे सामाजिक आणि आध्यात्मिक कार्यांसाठी किंवा समारंभांसाठी वापरली जात असावीत. दहा टन वजनाच्या प्राण्यांची हाडे गोळा करणे आणि त्यापासून घरे बांधणे हे मोठे काम होते. यासाठी संपूर्ण समुदायाच्या सहकार्याची आणि नियोजनाची गरज होती. यावरून दिसून येते की, हिमयुगातील मानव केवळ शिकारी नव्हता, तर तो एक कुशल वास्तुविशारद आणि संसाधनांचा प्रभावी वापरकर्ता होता. उपलब्ध संसाधने वापरून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही मानवाने आपले अस्तित्व टिकवून ठेवले,

## ताम जा ब्लू होलच्या अंतरंगात...

मेक्सिकोच्या चेतुमल खाडीच्या शांत पाण्याखाली एक अत्यंत खास शोध लागला आहे. तिथे हे मोठे 'ब्लू होल' सापडले आहे, ज्याला ताम जा ब्लू होल असे नाव देण्यात आले आहे. हे जगातील दुसरे सर्वात मोठे महासागरीय 'ब्लू होल' मानले जाते आणि हा पाण्याखालील सिंकहोल तब्बल २७४ मीटर (९०० फूट) खोल जातो. याबाबतच्या संशोधनाची माहिती 'फ्रंटियर्स' नावाच्या जर्नलमध्ये प्रकाशित झाली आहे.

या अभ्यासातील संशोधक या पाण्याखालील विवराच्या जटिल जल-पारिस्थितिकी तंत्राची आणि भूवैज्ञानिक वैशिष्ट्यांची तपासणी करत आहेत. मेक्सिकोच्या युकाटन द्वीपकल्पात असलेला हा खड्डा शास्त्रज्ञांना एका वेगळ्याच जगाची झलक देतो. माया भाषेत 'ताम जा' या



नावाचा अर्थ 'खोल पाणी' असा आहे. वरून पाहिल्यास हा खोल गोलाकार भाग सुमारे १,४७,००० चौरस फूट (जे अनेक शहरी ब्लॉक्स इतके मोठे आहे) समुद्राचा तळ व्यापतो. याला खास बनवतात त्याच्या चुनखडीने बनलेल्या आणि सरळ खाली जाणाऱ्या भिंती. ब्लू होलच्या पृष्ठभागावर सूक्ष्मजीवांचा एक थर जमा झालेला आहे. या भागात पाणी खारट आणि ऑक्सिजनयुक्त असते, जिथे खाडीतील छोटे जीव वाढतात. मात्र, खालच्या बाजूला परिसर झपाट्याने बदलतो. येथे ऑक्सिजनची पातळी खूप कमी होते आणि जीवन फक्त खास सूक्ष्मजीव आणि काही चिवट जीवांपर्यंत मर्यादित राहते. याखाली पाण्याचे तापमान आणि क्षाराचे प्रमाण अचानक बदलते, याला 'केमोकलाईन' म्हणतात, जिथे दोन वेगवेगळ्या प्रकारचे पाण्याचे थर एकत्र येतात.


छिद्राच्या अगदी तळाशी एक असा प्रदेश आहे जिथे ऑक्सिजन जवळपास नाहीच. या कठीण वातावरणात विरघळलेले मीठ, नायट्रोजन आणि सल्फर मोठ्या प्रमाणात आहेत. यामुळे हायड्रोजन सल्फाईड नावाचा विषारी वायू तयार होण्यास मदत होते, ज्याचा वास सडलेल्या अंड्यांसारखा असतो. हा अभ्यास सांगतो की, ताम जा ब्लू होल केवळ एक वैज्ञानिक आश्चर्य नसून, एक पारिस्थितिकी प्रयोगशाळादेखील आहे.

## डिमेन्शियाग्रस्तांसाठी रोबो वरदान?

जपानमध्ये डिमेन्शिया (स्मृतिभ्रंश म्हणजेच विस्मरण किंवा स्मरणशक्ती गमावणे) हे एक मोठे संकट बनत चालले आहे. गेल्या वर्षी, २०२४ मध्ये डिमेन्शियाने ग्रस्त असलेले सुमारे १८,००० हून अधिक वृद्ध लोक घराचा रस्ता विसरून भटकले. यापैकी ५०० जणांचे मृतदेह नंतर बेवारस अवस्थेत सापडले. आता अशा रुग्णांच्या मदतीसाठी सरकार एआय आणि रोबोंचा वापर करू लागले आहे.

जपानी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, २०१२ पासून म्हणजे गेल्या १२ वर्षांत अशा प्रकरणांची संख्या दुप्पट झाली आहे. त्यामुळे जपान सरकार डिमेन्शियाला एक मोठे आव्हान मानत आहे आणि या समस्येवर मात करण्यासाठी जपानी सरकार तंत्रज्ञानाचा वापर करत आहे. जीपीएस ट्रॅकिंग सिस्टीम, रोबोटिक सहायक आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) सारखी तंत्रज्ञानं डिमेन्शियाने पीडित लोकांना ट्रॅक करण्यात त्यांची ओळख पटवण्यात आणि त्यांना भावनिक आधार देण्यात मदत करत आहेत.

एका रिपोर्टनुसार, जपान सरकारने डिमेन्शियाबाबतच्या धोरणास आपल्या सर्वात आवश्यक धोरणांपैकी एक मानले आहे. जपानच्या आरोग्य




मंत्रालयाचा अंदाज आहे की, सन २०३० पर्यंत डिमेन्शियाशी संबंधित आरोग्य आणि सामाजिक देखभालीवरील खर्च १४ ट्रिलियन येन (सुमारे ९० अब्ज डॉलर) पर्यंत वाढेल. सध्या हा खर्च ९ ट्रिलियन येन इतका आहे. भटकणाऱ्या लोकांना शोधण्यासाठी जपानमध्ये जीपीएस आधारित प्रणाली स्वीकारली जात आहे. अनेक भागांमध्ये लोकांना घालता येणारे जीपीएस टॅग दिले जात आहेत. जर एखादी व्यक्ती ठरवलेल्या ठिकाणातून बाहेर गेली, तर हे टॅग त्वरित अधिकाऱ्यांना सूचित करतात.


यामुळे एक प्रकारचा सामुदायिक सुरक्षा कवच तयार होतो आणि हरवलेल्या व्यक्तीचा काही तासांत शोध लागतो. डिमेन्शियाचे लवकर निदान करण्यासाठीही नवीन तंत्रज्ञान विकसित केले जात आहे. फुजित्सूची (Fujitsu) aiGait AI प्रणाली डिमेन्शियाच्या सुरुवातीच्या लक्षणांचे, जसे की चालताना पाय फरफटणे किंवा उभे राहण्यास अडचण येणे, निदान करू शकते. वासेडा युनिव्हर्सिटीचे संशोधक AIREC नावाचा एक रोबो विकसित करत आहेत. हा १५० किलोग्रॅम वजनाचा मानवासारखा रोबो भविष्यात देखभाल सहायक म्हणून पाहिले जात आहे. हा रोबो मोजे घालणे, अंडी फेटणे किंवा कपड्याच्या घड्या करणे यांसारखी कामे करेल.

## बोलिव्हियामध्ये डायनासोरच्या पाऊलखुणांचे रेकॉर्डब्रेक कलेक्शन!

मध्य बोलिव्हियातील एका राष्ट्रीय उद्यानात शास्त्रज्ञांना डायनासोरच्या पाऊलखुणा आणि पोहण्याच्या खुणांचा आतापर्यंतचा सर्वात मोठा साठा सापडला आहे. या खुणा क्रेटेशियस कालखंडाच्या (१४५ दशलक्ष ते ६६ दशलक्ष वर्षांपूर्वी) शेवटी असलेल्या एका प्राचीन किनाऱ्यायाच्या बाजूला आहेत. या पाऊलखुणा आणि इतर मुद्रांसोबतच वाळूच्या लाटांचे स्वरूप वायव्य-आग्नेय दिशेने पसरलेले आढळले आहे, असे एका नवीन अभ्यासात म्हटले आहे. हा अभ्यास 'पीएलओएस वन' जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे.

बहुतेक खुणा डायनासोरच्या 'थेरोपोड' नावाच्या प्रजातीशी संबंधित आहेत. हे द्विपाद, तीन बोटांचे डायनासोर होते. यासोबतच अनेक पक्ष्यांच्या खुणाही येथे सुरक्षित अवस्थेत सापडल्या आहेत. टेक्सासमधील साऊथवेस्टर्न ॲडव्हेंटिस्ट युनिव्हर्सिटीमधील पॅलेओन्टोलॉजिस्ट आणि सहयोगी प्राध्यापक, तसेच अभ्यासाचे सह-लेखक जेरेमी मॅकलार्टी यांनी सांगितले, 'एकाच ट्रॅकसाईटसाठी डायनासोरच्या पाऊलखुणांची ही आतापर्यंतची सर्वात मोठी संख्या आहे. ते पुढे म्हणाले, 'जगात सर्वाधिक डायनासोरच्या खुणा जतन करण्याव्यतिरिक्त, येथे सर्वाधिक पोहण्याच्या खुणांचे मार्गही जतन केले गेले आहेत.'

मॅकलार्टी आणि त्यांच्या सहकाऱ्यायांनी बोलिव्हियाच्या कॅरेरास पाम्पा ट्रॅकसाईट येथे एकूण १६,६०० थेरोपोड पाऊलखुणा आणि १,३७८



पोहण्याच्या खुणांचे मार्ग मोजले. हे ठिकाण पूर्वीपासून माहीत होते, पण त्याचा योग्य अभ्यास किंवा दस्तऐवजीकरण झाले नव्हते. कॅरेरास पाम्पा हे टोरोटोरो राष्ट्रीय उद्यानात ८०,५७० चौरस फूट (७,४८५ चौरस मीटर) क्षेत्रावर पसरलेले आहे. संशोधन पथकाने विविध आकार आणि आकारांच्या पाऊलखुणा शोधल्या, ज्यावरून दिसून येते की, अनेक प्रकारचे थेरोपोड डायनासोर या प्राचीन किनाऱ्यायावर फिरत होते.

यापैकी काही खुणा ४ इंचांपेक्षा (१० सेंटीमीटर) कमी लांबीच्या होत्या, जे जीवाश्म रेकॉर्डमध्ये दुर्मीळ मानले जाते. या खुणा 'कोएलोफिसिस' सारख्या लहान थेरोपोड प्रजातीने केल्या की मोठ्या प्रजातीच्या लहान डायनासोरने, हे स्पष्ट झालेले नाही. सर्वात मोठ्या पाऊलखुणा १२ इंचांपेक्षा (३० सेंटीमीटर) अधिक लांब होत्या. पथकाला वाटते की, या खुणा 'डिलॉफोसोअरस' किंवा 'अलोसोअरस'सारख्या मध्यम आकाराच्या थेरोपोड डायनासोरने बनवल्या असाव्यात.

## दर्शन हिम बिबट्याचे

कुमाऊं हिमालयात हिम बिबट्याचे एक छायाचित्र कॅमेरात कैद झाले आहे, ज्यामुळे शास्त्रज्ञांना आश्चर्य वाटले आहे. नंदादेवी बायोस्फीयर रिझर्व्हमध्ये हिम बिबट्याची संख्या आणि परिसंस्थेचे संरक्षण यावर केंद्रित असलेल्या एका प्रकल्पांतर्गत ही महत्त्वाची नोंद झाली आहे.

कुमाऊं हिमालयात हिम बिबट्याची संख्या आणि अल्पाईन परिसंस्थेचे संरक्षण यावर केंद्रित असलेल्या एका महत्त्वपूर्ण प्रकल्पादरम्यान संशोधकांनी वन्यजीवनासाठी अत्यंत दुर्मीळ आणि आश्चर्यकारक नोंद केली आहे. उत्तराखंड सरकारच्या वन विभागाद्वारे राष्ट्रीय हरित भारत मिशनच्या निधीतून चालवलेला हा प्रकल्प नंदादेवी बायोस्फीयर रिझर्व्हच्या विशाल आणि कमी अभ्यासलेल्या पर्वतीय भूभागात सर्वोच्च मांसाहारी



प्रजातींची संख्या गतिशीलता आणि त्यांचे पर्यावरणीय संबंध याबद्दल माहिती देण्यासाठी कार्यरत आहे.

हा प्रकल्प आधुनिक वैज्ञानिक तंत्रांचा वापर करत आहे, जसे की कॅमेरा ट्रॅपिंग, चिन्ह-सर्वेक्षण आणि अधिवास-उपयोग मॉडेलिंग. याद्वारे हिम बिबट्या, त्याच्या शिकारीच्या प्रजाती आणि इतर मांसाहारी प्राण्यांची उपस्थिती व त्यांच्या हालचालींचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. पशुधन चराई, वन उत्पादनांचे (गैर-काष्ठ) संग्रहण आणि हवामान बदलामुळे वनस्पतींमध्ये होणारे बदल अन्नसाखळी आणि अल्पाईन परिसंस्थेच्या स्थिरतेवर कसा परिणाम करत आहेत, याचीही तपासणी संशोधन गट करत आहे. या विस्तृत अभ्यासादरम्यान, सुंदरधुंगा खोऱ्यात सुमारे ३,०१० मीटर उंचीवर बंगाल वाघाचीही दुर्मीळ वैज्ञानिक नोंद कॅमेरा ट्रॅपमध्ये रेकॉर्ड झाली आहे.

## ग्लेशियरच्या हालचालीतील चमत्कारीत स्पंदन!

ग्लेशियर (हिमनदी) हे सामान्यतः स्थिर असल्याचे मानले जाते; परंतु नासाच्या उपग्रहांनी गोळा केलेल्या माहितीमधून एक धक्कादायक सत्य समोर आले आहे. तापमानवाढीला प्रतिसाद म्हणून ग्लेशियरच्या हालचालीत आश्चर्यकारक हंगामी बदल दिसून येतात. या शोधातून हवामान बदलांमुळे हिमनद्यांचे भविष्यातील वर्तन कसे असेल, याबद्दल महत्त्वाचे संकेत मिळत आहेत.

ग्लेशियर ही बर्फाची विशाल नदी असते, जी स्थिर नसून ती सतत गतिमान असते. सायन्स जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या अभ्यासात, संशोधकांनी २०१४ ते २०२२ दरम्यान नासाच्या उपग्रहांनी टिपलेल्या ३.६ कोटींहून अधिक उच्च-रिझोल्यूशन प्रतिमांचे विश्लेषण केले. तापमानातील बदलांमुळे जगातील ग्लेशियरची गती हंगामानुसार कमी-जास्त होते, असे या अभ्यासात आढळले. काही ग्लेशियर वसंत ऋतूमध्ये तर काही उन्हाळ्यात वेगाने वाहतात. या हंगामी स्पंदनांचे सर्वात मोठे कारण म्हणजे बर्फ वितळून तयार होणारे पाणी आहे. जेव्हा वसंत किंवा उन्हाळ्यामध्ये तापमान वाढते, तेव्हा ग्लेशियरच्या पृष्ठभागावरील बर्फ वितळतो.

हे पाणी हिमनदीतील भेगांमधून खाली उतरून थेट हिमनदीच्या तळाशी पोहोचते. संशोधन पथकाचे प्रमुख ऑथर चॅड ग्रीन यांच्या मते, हे वितळलेले पाणी हिमनदीच्या तळाशी



वंगणासारखे कार्य करते. त्यामुळे हिमनदीच्या तळाचे घर्षण कमी होते आणि ती वेगाने समुद्राकडे सरकते. या संशोधनात २ लाखांहून अधिक ग्लेशियरचा अभ्यास करण्यात आला. जगभरातील ग्लेशियर त्यांच्या भौगोलिक स्थानानुसार वेगवेगळे हंगामी नमुने दर्शवतात.

अलास्कातील ग्लेशियरमध्ये वसंत ऋतूच्या सुरुवातीस वेग वाढतो. युरोप आणि रशियातील आर्क्टिक प्रदेशातील ग्लेशियर उन्हाळ्याच्या अखेरीस किंवा शरद ऋतूच्या सुरुवातीस त्यांच्या सर्वाधिक वेगावर पोहोचतात. ग्लेशियरच्या हालचालीचा वेग हा त्यांच्या आरोग्याचा सूचक असतो. जो ग्लेशियर उबदार महिन्यांत अधिक वेगाने वाहतो, तो दीर्घकाळच्या तापमानवाढीला अधिक असुरक्षित असू शकतो. नासाच्य

## पाऊणशे वर्षांचा विजडम... आजही अंडी घालतो!

जगातील कोणताही पक्षी असो तो किती वर्षे जगतो, याविषयी नेहमीच कुतूहल असते. काही अपवाद वगळता पक्षाचे वय फार मोठे नसते. मात्र, एक ७५ वर्षांचा पक्षी आहे, आणि तो आजही अंडी घालत आहे, असे जर सांगितले तर कोणीही त्यावर विश्वास ठेवणार नाही; पण हे खरे आहे. लेसन अल्बाट्रॉस प्रजातील एक पक्षी ज्याचे नाव संशोधकांनी 'विजडम' असे ठेवले आहे. विजडम ही चक्क ७५ वर्षांची असून, आजही ती यशस्वीरीत्या अंडी घालत आहे.

लेसन अल्बाट्रॉसचे सामान्य आयुष्य सुमारे ३० वर्षांचे असते; पण विजडमने ७५ वर्षांचे आयुष्य जगून अपेक्षेपेक्षा खूप मोठी मजल मारली आहे. यू.एस. फिश अँड वाईल्डलाईफ सर्व्हिसच्या जीवशास्त्रज्ञांनी १९५६ मध्ये, जेव्हा विजडमने पहिले अंडे घातले होते, तेव्हा तिला पहिल्यांदा ओळखले आणि तिच्या पायाला बँड लावला होता. विजडम सुमारे ६८ व्यांदा कुआईहेलानी (मिडवे अटोल) बेटावर परतली असून, तिने आजवर ५० ते ६० अंडी घातली आहेत आणि त्यातून सुमारे ३० पिल्लांना यशस्वीरीत्या वाढवले आहे.



अल्बाट्रॉस दरवर्षी फक्तएकच अंडे घालतो, त्यामुळे विजडमचा हा विक्रम अत्यंत तिचा पूर्वीचा दीर्घकाळचा साथीदार काही वर्षांपूर्वी दिसला नाही. यंदा ती ईएक्स२५ नावाच्या नवीन साथीदारासोबत बेटावर परतली आहे आणि दोघांनी घरटे बांधण्यास सुरुवात केली आहे. विजडमने तिच्या आयुष्यात सुमारे ३७ लाख मैल प्रवास केला आहे. या काळात तिने त्सुनामी, समुद्री प्रदूषण, मासेमारीचे धोके आणि हवामान बदलामुळे वाढणाऱ्याया धोक्यांना तोंड दिले आहे.

आजच्या काळात पर्यावरणाचे आणि बेटावरील प्रजनन स्थळांचे नुकसान होत असताना, विजडमचे सतत बेटावर परतणे वन्यजीव संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करते, असे संशोधकांचे मत आहे. विजडम केवळ एक दंतकथा नसून, कुआईहेलानी बेटाच्या संपूर्ण परिसंस्थेची राजदूत आहे. विजडमचा जीवनप्रवास दीर्घायुष्य, लवचिकता आणि निसर्गातील ताकद याची साक्ष देतो.

**कुआईहेलानी बेटाचे महत्त्व**

कुआईहेलानी हे उत्तर प्रशांत महासागरातील एक दुर्गम प्रवाळ बेट आहे. समुद्री पक्षी आणि सागरी जीवांच्या जीवनासाठी हे बेट अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.



सकल हिंदू समाजाचे निवेदन स्वीकारताना शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे. यावेळी संजय आडोळे, दिगंबर गेंट्याल, कमलेश जंजाळे, निशांत गोंधळी, अजय दराडे, महेश चिंतामणी उपस्थित होते.

# अहिल्यानगरचा अहमदनगर असा उल्लेख करणाऱ्यांवर कारवाई करा; सकल हिंदू समाजाची पोलिसांकडे मागणी

नगर – शहराचे नाव बदलून अहिल्यानगर करण्यात आले असतानाही, जाणिवपूर्वक अहमदनगर असा उल्लेख करुन व बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर शहरात गोहत्या करुन, उघड्यावर मांसाचा कचरा टाकून हिंदू समाजाच्या भावना दुखावणाऱ्यांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आली आहे.

याबाबत सकल हिंदू समाजाच्यावतीने संजय आडोळे, दिगंबर गेंट्याल, कमलेश जंजाळे, निशांत गोंधळी, अजय दराडे, महेश चिंतामणी, यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले आहे. हे निवेदन पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी हे निवेदन स्विकारले. या निवेदनात म्हटले आहे, बकरी ईद शांततेत पार पडली, ही आनंदाची बाब असली तरी, काही लोकांकडून जाणीवपूर्वक घटना आणि अहिल्यानगरच्या नागरिकांचा अपमान केला आहे. शासनाने शहराचे नामकरण अहिल्यानगर असे केले असतानाही, काही व्यक्तींकडून मुलाखतींमधून वारंवार अहमदनगर असा उल्लेख केला जात आहे.

बकरी ईदच्या काळात मुकुंदनगर, भिंगार आणि आलमगीर परिसरात मोठ्या प्रमाणावर गोहत्या झाली आहे. या गोहत्येनंतर उरलेले मांस (वेस्टेज) कचरा डेपोमध्ये आणि आलमगीर येथील माळीवाडा परिसरात भररस्त्यावर टाकण्यात आले होते. हा प्रकार अत्यंत संतापजनक असून, यामुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचे निवेदनात म्हटले आहे. पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी सदर मांसाचा कचरा उचलला असला तरी, या कृत्यामागील दोषी धर्मांधांवर आणि संबंधित घनकचरा विभाग प्रमुखांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सकल हिंदू समाजाने केली आहे.

# भविष्यकाळामध्ये भारताचा गौरव वाढवणारा समाज निर्माण करणे आवश्यक

## भैय्याजी जोशी यांचे प्रतिपादन; ग.म.मुळे व्याख्यानमालेत संघाच्या पंच परिवर्तनाच्या मुद्यांचे विश्लेषण



विचार भारती आयोजित ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेच्या चतुर्थ पुष्पात रा.स्व.संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

नगर – हजारो वर्षांपासून हिंदू समाज हा प्रगत आणि वैभवशाली परंपरा जपणारा समाज म्हणून अस्तित्वात आहे. काळानुरूप बदल स्वीकारत भारताने अनेक संकटांवर मात करत जगात आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. भविष्यकाळात भारताचा गौरव वाढवणारा, संस्कारित व जबाबदार समाज निर्माण करणे ही काळाची गरज आहे. यासाठी भारताचा आधार असलेल्या कुटुंब व्यवस्थेला सशक्त करणे, प्रकृतीला केवळ वंदन न करता तिच्या संरक्षण आणि संवर्धनाची जबाबदारी घेणे, देशासंबंधी सर्व कर्तव्य पार पडावेत., असे प्रतिपादन रा.स्व.संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांनी केले.

अहिल्यानगरमध्ये सुरू असलेल्या ग. म. मुळे स्मृती व्याख्यानमालेतील चतुर्थ पुष्प 'संघाची शताब्दी आणि पंच परिवर्तन' या विषयावर गुंफताना भैय्याजी जोशी बोलत होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे उद्योजक प्रभाकर शिंदे, रा.स्व.संघाचे प्रांत संपर्क प्रमुख कैलास सोनटक्के, जिल्ह्याचे माजी संघचालक डॉ. रवींद्र साताळकर, प्रांत धर्माचार्य मंडळ सदस्य सतीश मुळे, जिल्हा संघचालक वाल्मिक कुलकर्णी, विचार भारतीचे सदस्य मनोज झंवर, डॉ. सतीश सोनावणे, डॉ. अभिजित पाठक आदींसह विविध क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व.ग.म.मुळे यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी अभिवादन केले.

यावेळी भैय्याजी जोशी यांनी संघाच्या पंच परिवर्तनातील सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, प्रकृती संरक्षण, स्वदेशी आचरण आणि नागरिक कर्तव्य या पाच प्रमुख संकल्पनांचे सोप्या भाषेत विश्लेषण केले. भारताच्या प्रगतीचा आधार असलेल्या कुटुंब व्यवस्थेला अधिक सक्षम करणे आवश्यक असून जातीयता आणि जातीयवाद दूर करून सर्व समाज एकच हिंदू समाज आहे ही भावना दृढ करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. प्रकृती ही सर्वात शक्तिशाली असून तिचे केवळ पूजन न करता संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. संयमी जीवनशैली स्वीकारून पंचमहाभूतांचा अमर्याद वापर टाळणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच राष्ट्रहितासाठी स्वबोध जागृत होणे महत्त्वाचे असून भारतीय संस्कृती, मातृभाषा आणि देशी उत्पादनांचा अभिमानाने वापर करून अनुशासित, कर्तव्यदक्ष आणि आदर्श समाजाची निर्मिती करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. सार्वजनिक जीवनात अधिकाधिक चांगले व जबाबदारीने वागणारा समाज निर्माण झाला तर भविष्यात भारत जगात अधिक गौरवशाली स्थान मिळवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

भैय्याजी जोशी म्हणाले, भारताची कुटुंब व्यवस्था ही जगात अद्वितीय आहे. येणाऱ्या पिढीत संस्कारांचे बीजारोपण हे कुटुंब व्याव्स्थेतूनच होत आहे. मात्र या आदर्शवत कुटुंब व्यवस्थेला पाश्च्यत्य संकृतीची कीड लागली आहे. ही कीड व विकृती दूर केली नाहीतर ही कुटुंब व्यवस्था ढासळेल. म्हणून हे षडयंत्र वेळीच ओळखून जागे व्हा. समजांमध्ये उच्च नीच, शिक्षित अशिक्षित, गरीब श्रीमंत असे असे भेद व वितुष्ट वाढत आहेत. जातीयता व जातीयवादाची विकृती वाढत आहे. त्यामुळे हिंदूंचे संघटन होत नसल्याने या जातीयवादाच्या वृक्षाचा नाश करून त्याची बीजे नष्ट करणे आवश्यक आहे. सर्व एकच हिंदू समाज आहे या भावना रुजवणे आवश्यक आहे. इंग्रजांच्या व मुगलांच्या गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर पडून स्वबोध जागृत करा, असे सांगून सर्व नियम पाळणारा अनुशासित असा निर्दोष समाज निर्मितीसाठी देशासंबंधी कर्तव्य पाळण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलन झाले. उदय भणगे यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. आबा मुळे, मनोज झंवर, अशोकराव गायकवाड, डॉ. विक्रम डिडवाणिया, राहुल गांधी यांनी उपस्थितीत पाहुण्यांचा सत्कार केला. डॉ.ऋषिकेश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ.नीलकंठ ठाकरे यांनी आभार मानले.

# महामार्गावरील दिशादर्शक फलकांवरील जुनी नावे बदला; राष्ट्रवादी युवक काँग्रेसची मागणी; आंदोलनाचा दिला इशारा



सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता यू. ए. बोरुडे यांना निवेदन देताना सूरज कोतकर, दीपक खेडकर, नितीन घोडके, राजेश भालेराव, सूरज शिंदे, ऋषिकेश रासकर, संकेत कराड, गणेश भालसिंग आदी.

नगर – राज्य शासनाने अधिकृतपणे औरंगाबाद शहराचे नाव बदलून छत्रपती संभाजीनगर तसेच अहमदनगर जिल्ह्याचे नाव बदलून अहिल्यानगर असे घोषित केले असतानाही महामार्गावरील व सार्वजनिक ठिकाणांवरील दिशादर्शक फलकांवर अद्याप जुनीच नावे कायम असल्याने राष्ट्रवादी युवक काँग्रेसने तीव्र नाराजी व्यक्त करीत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासन निर्णयाची अंमलबजावणी न केल्याचा आरोप करत, आठ दिवसांच्या आत सर्व फलकांवरील नावे अद्ययावत करून छत्रपती संभाजीनगर व अहिल्यानगर अशी करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे.

या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता यू. ए. बोरुडे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष सूरज कोतकर, ओबीसी सेलचे अध्यक्ष दीपक खेडकर, कार्याध्यक्ष नितीन घोडके, शहर संघटक राजेश भालेराव, सूरज शिंदे, ऋषिकेश रासकर, संकेत कराड, गणेश भालसिंग, सक्षम जाधव, अभिजीत खरात, कृष्णा शेळके, ओंकार जाधव, सार्थक लोहार, शिवाजी शिंदे, निलेश रासकर, सनी टेकाडे, सार्थक तागड, आशिष भगत आदी पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शासन निर्णयानुसार सर्व शासकीय फलक, दिशादर्शक बोर्ड व सार्वजनिक ठिकाणांवर अधिकृत नवीन नावे वापरणे बंधनकारक आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी अद्याप औरंगाबाद व अहमदनगर ही जुनी नावे कायम दिसून येत आहेत, ही गंभीर बाब आहे. शासन आदेशाचे उल्लंघन होत असल्याचा मुद्दा उपस्थित करीत यामुळे नागरिकांच्या भावना दुखावल्या जात असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. जर आठ दिवसांच्या आत सर्व फलकांवरील नावे बदलण्यात आली नाहीत, तर तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडले जाईल. तसेच लोकशाही मार्गाने निषेध नोंदविण्यात येईल आणि संभाव्य परिस्थितीला प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

# 'प्रवेशबंदी' तोडून शहरात घुसणाऱ्या अवजड वाहनांवर कारवाईची मोहीम

(पान १ वरुन)



शहरात प्रवेश करणाऱ्या वाहनांना अडवून शहराबाहेरच थांबवण्यात येत आहे.


वसूल करण्यात आला. ही सर्व वाहने पुणे रोडवरील मारुती शोरुमसमोर असलेल्या मैदानात आणि चेतना लॉनजवळील मैदानात थांबवून ठेवून दंड वसूल झाल्यानंतर रात्री १० वाजेनंतर सोडून दिली जात आहे. ही कारवाईची मोहिम यापुढेही सुरुच राहणार असल्याचे पोलीस निरीक्षक बोरसे यांनी सांगितले.

पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, अहिल्यानगर शहर विभाग यांच्या आदेशानुसार, शहर वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी बाबासाहेब बोरसे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई पार पडली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक शामुवेल गायकवाड, अन्सार शेख, सहाय्यक फौजदार कोडम, पोलीस हवालदार कांबळे, पोलीस शिपाई चव्हाण, खंडागळे, दळवी, दहिफळे आणि राठोड यांनी सहभाग घेतला.

## जानेवारीपासून ४६ लाखांची दंड आकारणी

अहिल्यानगरमध्ये अवजड वाहनांच्या प्रवेशावर बंदी घातलेली असतानाही नियमांचे उल्लंघन करुन शहरात प्रवेश करणाऱ्या तब्बल ३ हजार ७४८ वाहनांवर जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत कारवाई करून ४६ लाख ५७ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

# दौंड-मनमाड रेल्वेमार्गावर ३० मे रोजी हायस्पीड ट्रायल; सारोळा कासार ते विसापूर दरम्यान होणार वेगाची चाचणी



नगर – दौंड-मनमाड रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाचे काम सध्या वेगाने सुरू असून, या प्रकल्पाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यात ३० मे रोजी हायस्पीड इंजिन ट्रायल घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रेल्वे प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

रेल्वे प्रशासनाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील सारोळा ते विसापूर या सेक्शनमध्ये सुमारे १६.२० किलोमीटर अंतरावर ही हायस्पीड चाचणी पार पडणार असून, या वेळी इंजिनाचा वेग ताशी १३० किलोमीटर इतका असणार आहे. हायस्पीड ट्रायलदरम्यान रेल्वे मार्गावरील तसेच लगतच्या गावांतील नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. लहान मुले, जनावरे तसेच अन्य व्यक्ती रेल्वे रुळांजवळ जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# कोळगाववाले बाबा यांचा ३ आणि ४ जूनला संदल व ऊरुस

नगर – सर्वधर्मियांचे श्रद्धास्थान असलेल्या हजरत सय्यद अहमदशहा अकबरशाह (रहे.) उर्फ कोळगाववाले बाबा यांचा संदल व ऊरुस दरवर्षीप्रमाणे यावर्षी ३ व ४ जून रोजी होत आहे. या कार्यक्रमासाठी संयोजक मंडळाकडून जय्यत तयारी सुरू असून, कोणत्याही भाविकाची गैरसोय होणार नाही, यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

३ जून रोजी संदल व ४ रोजी ऊरुस होत आहे. यानिमित्त ४ जूनला रात्री ९ वा. कव्वाल हैदर नाजा व तौसिफ जुनैदी यांच्या सुश्राव्य कव्वालीचा कार्यक्रम होणार आहे. याच दिवशी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले असून याचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन कोळगाववाले बाबा ऊरुस समितीतर्फे करण्यात आले आहे. कोळगाववाले बाबा यांच्या संदल व ऊरुस आणि कव्वाली व महाप्रसाद अशा सर्व धार्मिक कार्यक्रमांचा सर्वधर्मिय भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कोळगाववाले बाबा ऊरुस समितीतर्फे सर्व विश्वस्त, मुजावर व ऊरुस समिती आणि कोळगाव गावकऱ्यांतर्फे करण्यात आले आहे.

# एक स्त्री निरोगी राहिली तर परिवारासोबत समाज निरोगी बनवते

## डॉ. कांकरिया यांचे प्रतिपादन; आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग तपासणी शिबिरास प्रतिसाद



आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग, गर्भवती महिला तपासणी शिबिराचे उद्घाटन करताना डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया आदी.

नगर –आमच्या मातोश्री स्वातंत्र्य सैनिका स्व. मानकुवरबाई कांकरिया यांनी स्वातंत्र्यसंग्रामात महात्मा गांधी व विनोबा भावे यांच्यासोबत काम केले आहे.तसेच स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी नऊ महिन्यांचा तुरुंगवास भोगला आहे.स्वातंत्र्य सैनिका म्हणून त्यांचा भारत सरकारने गौरव केला आहे.त्यांची सून असल्याचे भाग्य मला लाभले आहे. स्त्री ही सृष्टीचा आधार आहे. कुटुंबाचा आधारस्तंभ आहे. आई ही पाठशाळा व पहिली गुरु असते. वास्तल्य नावाच्या जागतिक विद्यापीठाचे कुलगुरू आई हीच असते. एक स्त्री शिकली तर कुटुंब साक्षर होते. त्याचप्रमाणे एक स्त्री निरोगी राहिली तर परिवारा सोबतच समाज निरोगी बनवते, असे प्रतिपादन समाजसेविका डॉ.सुधाताई कांकरिया यांनी केले आहे.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्त्रीरोग,गर्भवती महिला तपासणी व सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन स्वातंत्र्य सैनिका स्व.मानकुवरबाई कन्हैयालालजी कांकरिया यांच्या स्मरणार्थ कांकरिया परीवाराच्यावतीने करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन नेत्ररोग तज्ञ डॉ.प्रकाश कांकरिया व डॉ. सुधाताई कांकरिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी जैन सोशल फेडरेशनचे डॉ. वसंत कटारिया, माणकचंद कटारिया, अभय गुगळे, सुभाष मुनोत, वसंत चोपडा, प्रकाश छल्लाणी, डॉ. आशिष भंडारी तसेच शिबिराचे तज्ञ डॉ.रवींद्र मुथा,डॉ. कृतिका पाटील आदी उपस्थित होते.

डॉ.सुधा कांकरिया पुढे म्हणाल्या, निरोगी आरोग्य संपन्न समाजाची गुरुकिल्ली एक स्त्रीच असते. घराला घरपण देणारी ही देखील एक स्त्रीच असते. या शिबिराच्या माध्यमातून महिलांच्या विविध आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. तसेच गर्भवती मातांची देखील तपासणी होणार आहे. आईचा गर्भ हे तीर्थक्षेत्र आहे.आईच्या गर्भात मुलगा किंवा मुलगी असो त्यांचे मनापासून स्वागत झालेच पाहिजे. जन्माला येण्यापूर्वीच मुलगी आहे म्हणून ती ची हत्या केली. तर यासारखे महापाप कोणतेच नाही. गर्भात असलेल्या बाळाचे रक्षण करणे.हे ध्येय बाळगून स्त्री जन्माचे स्वागत करावे.

प्रास्ताविकात डॉ. वसंत कटारिया म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या उभारणीपासूनच डॉ. कांकरिया यांचे मोलाचे योगदान लाभत आहे. डॉ. कांकरिया यांच्या मातोश्री स्व. मानकुवरबाई कांकरिया या थोर स्वातंत्र्य सैनिका होत्या. तसेच डॉ. सुधाताई कांकरिया यांनी बेटी बचाव बेटी पढाओ व स्त्री जन्माचे स्वागत करा हा नारा देऊन गेली ४० वर्ष समाजसेवेच्या कार्यात अग्रेसर आहेत.तसेच ब्रह्मकुमारी ईश्वरीय विद्यालयाच्या माध्यमातून योग शिबिरात योगदान देत आहेत. योगाची आवड निर्माण करीत आहेत.जैन सोशल फेडरेशनच्या कार्यात डॉ. प्रकाश कांकरिया यांच्यासारखे निस्वार्थ सेवेचे कार्य करणारे विश्वस्त लाभले आहे.

डॉ. कृतिका पाटील म्हणाले, गर्भवती महिलांनी बाळंतपणाच्या काळात पालेभाज्या, ड्रायफ्रूट्स, फलाहार व सकस आहार घेणे महत्त्वाचे आहे. तसेच गर्भवती महिलांनी तीस ते पस्तीस मिनिटे चालणे, फिरणे आवश्यक आहे. प्रोटीन युक्त व सकस आहार घेतल्यामुळे गर्भातील बाळाच्या वजनामध्ये व्यवस्थित वाढ होईल. गर्भवती महिलांना रक्तलघवी, सोनोग्राफी, एक्स–रे विविध तपासण्यांसाठी ५० टक्के सवलत देण्यात येणार आहे. तसेच १८ वयाच्या पुढील महिलांनी वेळेवर तपासणी करण्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे संपर्क साधावा, असे आवाहन केले. शिबिरात ६० रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

# एमआयडीसी कार्यालयासमोर शेतकऱ्यांचे उपोषण सुरू

## वाढीव भरपाई, नोकरी आणि प्रकल्पग्रस्त हक्कांसाठी आंदोलन



पांढरी पूल येथील औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्याबाबत अन्याय झाल्याचा आरोप करत शिंगवे तुकाई येथील शेतकऱ्यांनी अहिल्यानगर येथील एमआयडीसी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

नगर – नेवासा तालुक्यातील पांढरी पूल येथील औद्योगिक वसाहतीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमिनींच्या मोबदल्याबाबत अन्याय झाल्याचा आरोप करत शिंगवे तुकाई येथील शेतकऱ्यांनी २७ मे अहिल्यानगर येथील एमआयडीसी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पांढरी पूल येथील शासकीय औद्योगिक वसाहतीसाठी शिंगवे तुकाई परिसरातील सुमारे १६० शेतकऱ्यांची २५४ हेक्टर पिकाऊ जमीन संपादित करण्यात आली होती. या ठिकाणी काही उद्योग सुरू झाले असले तरी जमीन संपादनावेळी शासन आणि अधिकाऱ्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात आलेली नाहीत. तसेच भूसंपादन कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन झाल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

शेतकऱ्यांनी शासनाकडे विविध मागण्या मांडल्या आहेत. इतर प्रकल्पांप्रमाणे एकरी ५० लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, प्रकल्पग्रस्तांना पांढरी पूल एमआयडीसीमध्ये व्यवसायासाठी हेक्टर २५ गुंठे मोफत जागा उपलब्ध करून द्यावी, प्रकल्पग्रस्त दाखले तातडीने द्यावेत, तसेच प्रत्येक बाधित कुटुंबातील किमान एका सदस्याला कायमस्वरूपी नोकरी द्यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय थकीत नुकसानभरपाई व्याजासह मिळावी, व्यवसायासाठी जागा न दिल्यास अतिरिक्त आर्थिक भरपाई द्यावी, प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना शासकीय सेवेत आरक्षण मिळावे आणि शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण मोफत करण्यात यावे, अशाही मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या आहेत.

या उपोषणात राजेश होंडे, पांडुरंग होंडे, म्हातारदेव पुंड, किसन होंडे, सुभाष दिघे, नामदेव कुऱ्हाड, दामोदर पुंड, आशिष ठोकळ, विमल आरु, शरद धङगे, रमेश आरु आदी शेतकरी सहभागी झाले आहेत.

एमआयडीसी प्रशासनाने आंदोलनाची तातडीने दखल न घेतल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा राजेश होंडे आणि पांडुरंग होंडे यांनी दिला आहे. यासाठी प्रशासनाला कोणतीही पूर्वसूचना दिली जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# नगरमध्ये मोफत श्रवण तपासणी शिबिराचे आयोजन; श्रवणयंत्रांवर मिळणार ३० टक्क्यांपर्यंत विशेष सवलत

नगर – कमी ऐकू येणे, कानात सतत आवाज येणे, संभाषण स्पष्ट समजण्यास अडचण येणे अशा विविध श्रवण समस्यांवर मार्गदर्शन व उपचारासाठी न्यूमा हेअरिंग अ‍ॅण्ड स्पीच थेरपी क्लिनीकच्या वतीने दोन दिवसीय मोफत श्रवण तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर ३१ मे व १ जून रोजी सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये अनुभवी व प्रमाणित ऑडिओलॉजिस्टकडून अत्याधुनिक उपकरणांच्या सहाय्याने श्रवण तपासणी करण्यात येणार असून विविध प्रकारची आधुनिक व आंतरराष्ट्रीय दर्जाची श्रवणयंत्रे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. विशेष म्हणजे श्रवणयंत्रांवर तब्बल ३० टक्क्यांपर्यंत विशेष सवलत देण्यात येणार आहे.

शिबिरात BTE, RIC व CIC प्रकारातील आधुनिक तसेच रिचार्जेबल Hearing id उपलब्ध राहणार असून चार्ज करा आणि वापरा या सुविधेमुळे वारंवार सेल बदलण्याची गरज भासणार नाही. नागरिकांना श्रवणयंत्र खरेदीपूर्वी २ ते ३ दिवसांची मोफत ट्रायल सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

याशिवाय श्रवणयंत्र खरेदी करणाऱ्या ग्राहकांना ४ महिन्यांचे सेल मोफत, जुन्या श्रवणयंत्राच्या एक्सचेंजवर विशेष सवलत, वरिष्ठ नागरिकांसाठी अतिरिक्त ५ टक्के सूट तसेच एक महिन्याची मोफत फॉलो–अप सेवा देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. श्रवणदोष असलेल्या रुग्णांसाठी योग्य मार्गदर्शन, श्रवणयंत्र निवड, सर्विस व मेंटेनन्स सुविधा तसेच तज्ञांचा सल्ला या शिबिरामध्ये उपलब्ध राहणार आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. पूर्वनोंदणी आवश्यक असून नाव नोंदणीसाठी ९३७११२१२१० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा. शिबिर स्थळ – न्यूमा हेअरिंग अँड स्पीच थेरपी क्लिनीक, ड्रिमलॅण्ड अपार्टमेंट, सारस्वत बँक समोर, हेल्थकार्टच्या बाजूला, झोपडी कॅन्टीन, सावेडी रोड, अहिल्यानगर. येथे आहे.

